जुलै २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५२
वर्ष ७६वे, पुष्प १२वे
निज ज्येष्ठ–आषाढ
शके १९४८

**UGC-CARE Listed Research Journal**
(Since-Jun2019)

www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना : १५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य – १८ रु.



# श्रुतपंचमी के पावन अवसर पर 'श्रुतम् AI' का भव्य लोकार्पण

पुणे, १९ जून २०२६ : श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट, मुंबई और FLAME University, Pune के संयुक्त प्रयास से धर्मप्रचार और स्वाध्याय के क्षेत्र में तकनीक-संचालित एक महत्त्वपूर्ण पहल के रूप में 'श्रुतम् AI' मॉड्यूल का भव्य लोकार्पण किया गया। यह लोकार्पण FLAME University, Pune में आयोजित अध्यात्म ज्ञान शिबिर के दौरान लगभग १००० साधर्मियों की गरिमामयी उपस्थिति में सम्पन्न हुआ।

इस विशेष अवसर पर श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट, मुंबई द्वारा विकसित 'श्रुतम् AI' को ऐसे डिजिटल साधर्मी के रूप में प्रस्तुत किया गया, जो कृत्रिम बुद्धिमत्ता के माध्यम से स्वाध्याय को अधिक सुलभ, प्रभावी और प्रेरक बनाने के साथ-साथ जिज्ञासुओं की शंकाओं का समाधान करने में सहायक सिद्ध होगा।

कार्यक्रम के प्रारम्भ में वीतरागवाणी प्लेटफ़ॉर्म की विस्तृत जानकारी प्रदान की गई। वीतरागवाणी, श्री कुन्दकुन्द-कहान पारमार्थिक ट्रस्ट की एक दीर्घकालिक और महत्त्वपूर्ण पहल है, जिसके माध्यम से जैन धर्म के सिद्धांतों, अध्यात्म, स्वाध्याय और वीतराग वाणी का व्यापक प्रचार-प्रसार निरंतर किया जा रहा है। 'श्रुतम् AI' इसी सतत आध्यात्मिक एवं शैक्षिक उपक्रम की एक अभिनव कड़ी है। आज के इस डिजिटल युग में टेक्नोलॉजी हमारे जीवन का एक अहम हिस्सा बन चुकी है। हमारे दैनिक कार्यों को करने में हम कदम-कदम पर टेक्नोलॉजी का सहारा लेते हैं, तो क्यों न स्वाध्याय और शास्त्र अभ्यास द्वारा आत्महित करने के लिए भी इस टेक्नोलॉजी का उपयोग किया जाए। श्रुतम् AI tool एक ऐसा साधन है। जो जिनवाणी के असीम, विशाल सागर में से हमारे इच्छित विषयों को हमारे मनचाहे रत्नों को ढूंढ कर लाता है, ताकि हर साधर्मी, हर पाठक प्रामाणिक रूप से जिनवाणी के रहस्यों का लाभ उठा सके।

ट्रस्ट के सहयोगी, प्रतिभावान विद्वान एवं विशेषज्ञ राहुलजी शास्त्री ने उपस्थित साधर्मियों को 'श्रुतम् AI' की कार्यप्रणाली, उपयोगिता तथा इसकी विशिष्ट विशेषताओं से परिचित कराया। उनके मार्गदर्शन में प्रस्तुत लाइव डेमो ने सभी उपस्थितजनों को अत्यंत प्रभावित किया और यह अनुभव कराया कि यह AI Tool न केवल साधारण जिज्ञासाओं के उत्तर देगा, बल्कि पठनार्थियों, साधकों, विद्वानों एवं शोधकर्त्ताओं के लिए संदर्भित उद्धरण, ग्रन्थ निर्देश और विषयानुक्रमित पठन-मार्ग भी प्रदान करेगा। साथ ही Modern भाषा और multpile language Support ताकि हर आयु और पृष्ठभूमि का व्यक्ति सहजता से जुड़ सके। इस उपक्रम का मकसद केवल जानकारी देना नहीं; इसका लक्ष्य है, ज्ञान की अनुभूति जगाना। तो आइए, आज हम इस साधन को अपनाएँ...


जिज्ञासा से...ज्ञान तक... शंका से...समाधान तक...

लीजिए प्रस्तुत है आपका अपना डिजिटल साधर्मी श्रुतम् AI www.shrutamai.com

इसके उपरांत 'श्रुतम् AI' के निर्माण से जुड़ी टीम का औपचारिक परिचय कराया गया। अनेक मान्यवरों की उपस्थिति ने कार्यक्रम की शोभा को और अधिक बढ़ाया।

श्रुतपंचमी के अवसर पर पूरे भारत वर्ष में इसका लोकार्पण अत्यंत हर्षोल्लास पूर्वक किया गया।

-वीतराग-वाणी टीम




प. पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांच्या आचार्य पदारोहणानिमित्त श्रुतपंचमी पर्वप्रसंगी श्रुत-अर्पण करताना...

श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे श्रुतपंचमी पर्वप्रसंगी इंदौरनिवासी पं. श्री. **विकासजी छाबडा** यांनी आपल्या पूर्वीपासून असणाऱ्या जैनकोष या बेबसाईटच्या माध्यमातून तत्त्वज्ञानाचा प्रचार करित असताना आता नवीन कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेऊन AIच्या माध्यमातून जैन धर्म, संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, आचार-विचार याविषयी कोणतेही प्रश्न विचारल्यास आगमानुकुल उत्तरे अवश्य मिळतील असा AI त्यांनी सुरु केल्याचे घोषित केले. आपण सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा. तसेच पहावे...

www.jainkosh.com

सत्प्रेरणा–शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन–४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक–संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

**जुलै २०२६**

❍ **वर्ष: ७६ वे**

❍ **पुष्प १२वे**

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-

**❍ संपादक मंडळ ❍**

❍ **श्री. गोमटेश बेडगे,** एम.ए., बी.एड्.

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी. **(का.सं.)**

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **श्री. प्रदीप धोतरे,** शास्त्री, एम.ए., बी.एड्.

**बँक खात्याचे विवरण –**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388
Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

**(अंकातील विचाराशी सन्मति-मासिक परिवार सहमत असेलच असे नाही.)**

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

✻संपादकीय.. जैन कॉमिक्स – चित्रकथांतून जैन तत्त्वज्ञानाची ओळख ०४

✻मराठी जैन मासिक 'सन्मति'मधील कथांचा चिकित्सक अभ्यास (१९५० ते २०००) –श्री. संदीप धन्यकुमार आंबेकर, जिंतूर ०८

✻ प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (लेख क्र. १४३)– आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी १५

✻ योगसार चिंतन (पुष्प १५) – प्रियदर्शन जैन १८

✻ अनंतानुबंधी कषाय : स्वरूप का ऊहापोह (भाग ४) –Discussion on Jainism Whatsapp २०

✻ सोलहकारण भावना भाय....! (लेखांक १५) –हर्षा वेखंडे, नागपूर २३

✻ पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ (लेखांक – ३०) –विपुल खेडकर, नागपूर २७

✻ पुस्तक समीक्षण–रतन टाटा – एक दीपस्तंभ (लेखक–शंतनू नायडू) – ओजस्वी खंडारे, पुणे ३२

✻ आचार्य पूज्यपाद कृत सर्वार्थसिद्धि का समीक्षात्मक अध्ययन (डॉ. आलोक जैन) –अनिल जैन, शास्त्री, जयपूर ३४

✻ श्री. धनंजय श्रीपाल शहा – परिचय.. – सन्मती शहा, पुणे ३६

✻ बाहुबली विद्यापीठाची अब्दुल लाट शाखा – श्री. के. बी. गडकरी ३८

✻ भाव सुमनांजली..!! – डॉ. लीना उदय चवरे, कारंजा लाड ४१

# जैन कॉमिक्स – चित्रकथांतून जैन तत्त्वज्ञानाची ओळख

आजची मुले मोबाइल, लघु व्हिडिओ, गेम्स आणि झटपट मनोरंजनाच्या जगात वाढत आहेत. अशा काळात जैन धर्मातील कथा, तत्त्वे, आदर्श चरित्रे आणि आत्मचिंतन मुलांपर्यंत कसे पोहोचवायचे, हा प्रत्येक पालक, पाठशाळा आणि समाजासमोरील महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रवचने ऐकणे किंवा ग्रंथ वाचणे ही पुढची पायरी आहे; पण त्या दिशेने मुलांची पहिली ओढ निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. येथे कथा, चित्रे, संवाद आणि प्रसंग यांची मोठी भूमिका असते.

मराठी भाषेत जैन धर्म, जैन कथा आणि जैन तत्त्वज्ञान यांवर आधारित कॉमिक्स यापूर्वी उपलब्ध नव्हती. म्हणूनच जैन कॉमिक्सचा हा मराठी उपक्रम मराठीतील पहिली जैन कॉमिक्स मालिका म्हणून विशेष महत्त्वाची ठरते. हा उपक्रम पूर्णपणे नवीन कथा तयार करण्याचा प्रयत्न नाही; तर जुन्या जैन चित्रकथांना आधुनिक डिजिटल कलाकृती, सुबोध मराठी भाषा आणि परिष्कृत संवादांसह नव्या पिढीसाठी पुन्हा जिवंत करण्याचा सुंदर प्रयत्न आहे. खरे तर ही कॉमिक्स केवळ मुलांसाठीच नाहीत. मोठ्यांनाही आणि ज्येष्ठांनाही या कथा वाचताना तितकाच रस वाटू शकतो; कारण त्यांत कथा आहे, संघर्ष आहे, भावना आहेत आणि शेवटी अंतर्मुख करणारा विचारही आहे. जैन धर्माचा पूर्व अभ्यास किंवा पार्श्वभूमी नसलेल्या वाचकांनाही या कॉमिक्स सहज समजू शकतात. त्यामुळे जैन तत्त्वज्ञानाची ओळख नसलेल्या व्यक्तीलाही या कथा रंजक, विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी वाटू शकतात.

ही कॉमिक्स जिनवाणीचा स्वाध्याय, प्रवचन किंवा पाठशाळेचा पर्याय नाहीत; पण त्या दिशेने नेणारा एक आकर्षक सेतू नक्कीच ठरू शकतात. मुलांना कथा आधी समजते, मग पात्रे आवडतात, मग प्रश्न पडतात आणि तेथून विचार सुरू होतो. याच अर्थाने जैन कॉमिक्स हा केवळ मनोरंजनाचा उपक्रम नसून संस्कार, चिंतन आणि धर्माभिमुख वाचनाची पहिली पायरी आहे.

या मालिकेत एकूण १८ कॉमिक्स दोन संचांमध्ये उपलब्ध आहेत. विषयांचा पटही अत्यंत व्यापक आहे. – अगदी सोप्या संस्कारकथांपासून जीवदया, दान, साधर्मी–वात्सल्य, वैराग्य, कर्मसिद्धांत, तीर्थंकर चरित्रे, पंच–कल्याणक आणि मोक्षमार्ग. प्रत्येक वाचकाची आवड वेगळी असते; त्यामुळे प्रत्येकाला प्रत्येक कॉमिक्स तितकी भावेलच असे नाही, पण या १८ कथांमधून प्रत्येक वाचकाला आपल्या मनाला भिडणाऱ्या काही कथा नक्कीच सापडतील. येथे या कथांचा थोडक्यात सारांश देत आहे.–

**जैन कॉमिक्स कोणत्या भाषेत उपलब्ध आहेत?**
**मराठी, हिंदी आणि इंग्रजी**

**संच १**

**१. काय मोठी गोष्ट आहे? –** एका छोट्याशा हिऱ्यामुळे आई आणि दोन्ही भावांच्या मनात होणारे बदल ही कथा प्रभावीपणे दाखवते. संपत्ती माणसाला मोठे करते की लोभ त्याच्या मनातील माणुसकी हिरावून घेतो, हा प्रश्न वाचकांसमोर उभा राहतो. ‘लोभ पापाचा बाप आहे आणि परिग्रहाला मर्यादा असली पाहिजे,’ हा या कथेतला अंतर्मुख करणारा संदेश आहे.

**२. अभयदान –** धर्मशाळेसाठी केलेले दान, पण त्यातून निर्माण झालेला अहंकार, मालकीचा भाव आणि राग, ही कथा दानामागील भावनेचे महत्त्व दाखवते. दान पुण्यदायी ठरते की पतनाचे कारण बनते, हे बाह्य कृतीवर नव्हे, तर अंतःकरणावर

अवलंबून असते. अपेक्षारहित आणि करुणाभावाने केलेले दानच खऱ्या अर्थाने श्रेष्ठ ठरते.

**३. टीलेवाले बाबा (महावीरजी) –** साधा गुराखी चतुरा, त्याची श्रद्धाळू पत्नी लक्ष्मी आणि धौरी गायीच्या अद्भुत संकेताने उलगडणारी पवित्र मूर्तीची कथा भक्तिभावाने भरलेली आहे. टेकडीखाली दडलेले पावन रहस्य, चतुराच्या स्पर्शाने हलणारा रथ आणि महावीरजी तीर्थाची स्थापना, या प्रसंगांतून श्रद्धा, भक्ती आणि जनमानसाला जोडणारी धार्मिक भावना सुंदरपणे प्रकट होते.

**४. रक्षाबंधन –** ७०० मुनींवर आलेला घोर उपसर्ग, धगधगती आग, धूर, काटे आणि मंत्र्यांचा सूड, या सर्वांमध्ये मुनिसंघाची अचल शांतता आणि तपश्चर्या विलक्षण उंची घेते. रक्षाबंधन हा केवळ धागा नसून धर्म, साधर्मी-वात्सल्य आणि संकटसमयी उभे राहण्याचा संकल्प आहे, हे या कथेतून समजते. धर्माचे रक्षण साधर्मींच्या रक्षणाविना अपूर्ण आहे, हा तिचा मुख्य संदेश आहे.

**५. प्रद्युम्न हरण –** द्वारकेचा राजदरबार, नारदजींची योजना, रुक्मिणीचे हरण आणि जन्मानंतर पाचव्या दिवशी बाळ प्रद्युम्नाचे रहस्यमय अपहरण, या घटनांमुळे कथा उत्कंठावर्धक बनते. सूड, मत्सर, नियती, धैर्य आणि पुनर्मिलन यांचा यात प्रभावी संगम आहे. राजवैभव आणि सांसारिक सुखे अनुभवूनही प्रद्युम्न शेवटी संसाराचे क्षणभंगुर स्वरूप ओळखतात, वैराग्य धारण करतात आणि मोक्षमार्गावर अग्रेसर होतात.

**६. कौण्डेश ते कुंदकुंद –** साधा-भोळा गुराखी कौण्डेश मुनिराजांचे वचन ऐकतो. - 'सगळ्या जीवांमध्ये भगवान बनण्याची योग्यता आहे.' हे वचन त्याच्या अंतःकरणात उतरते आणि एका सामान्य जीवाचा असामान्य आध्यात्मिक प्रवास सुरू होतो. आत्मज्ञानाच्या मार्गावर चालणारा साधा गुराखीही युगानुयुगे स्मरणात राहणारा आचार्य होऊ शकतो, हे ही कथा सांगते.

**७. अनंगधरा –** राजमहालात वाढलेली राजकुमारी, धर्मशिक्षणातून जागलेली आत्मदृष्टी आणि अचानक झालेले अपहरण, या घटनांनी अनंगधरेचे जीवन एका क्षणात बदलते. राजवैभव नाहीसे होते आणि ती भयानक जंगलात एकटी पडते; तरीही धर्म, समता आणि क्षमेचा आधार ती सोडत नाही. संकट कितीही भयंकर असले तरी आत्मबलाने जगलेले जीवन साधना बनू शकते, आणि मृत्यूही महोत्सव ठरू शकतो, हा या कथेतला गहन संदेश आहे.

**८. नेमिनाथ-राजुल –** भव्य वरात, मंगल गान आणि हातात वरमाला घेऊन नेमिनाथांची वाट पाहणारी राजुल, पण याच वेळी कैदेत ठेवलेल्या प्राण्यांचे केविलवाणे रडणे नेमिनाथांच्या कानावर पडते. या प्रसंगातून नेमिनाथांच्या अंतःकरणात जीवदया आणि वैराग्य जागृत होते. खरा जीवनसाथी तोच, जो आपल्याला मोहात अडकवत नाही, तर धर्ममार्गावर दृढपणे चालण्याची प्रेरणा देतो, हे ही कथा सांगते.

**९. ते तीन दिवस –** मोहरीचा दाणाही ज्याच्या शरीराला टोचत होता आणि दिव्याचा प्रकाशही ज्याच्या डोळ्यांना सहन होत नव्हता, असा अतिशय कोमल सुकुमाल या कथेत केंद्रस्थानी आहे. आयुष्याचे फक्त तीन दिवस उरले असताना मुनिराजांचा उपदेश त्याच्या कानावर पडतो आणि आत्मजागृतीचा प्रवास सुरू होतो. आत्मकल्याणाची दिशा पकडण्यासाठी उरलेला एक क्षणही अमूल्य असतो, हा कथेचा प्रभावी संदेश आहे.

**संच- २**

**१०. सिकंदर आणि कल्याण मुनी –** 'माझ्यासाठी काहीही अशक्य नाही,' असे मानणारा सिकंदर दिगंबर जैन मुनींच्या शांत तेजासमोर थबकतो. आचार्य दौलतरामांच्या गहन विचारांतून आणि कल्याण मुनींच्या करुणामय उपदेशातून बाह्य विजय आणि अंतर्मनाचा विजय यांतील फरक उलगडतो. अहंकार आणि आत्मज्ञान, सत्ता आणि संयम, विजय आणि वैराग्य यांचा सुंदर संगम या कथेत अनुभवायला मिळतो.

**११. भामाशाह –** हल्दीघाटीनंतर जखमी मेवाड, रिकामा खजिना आणि महाराणा प्रतापांना तह

करावा लागू शकतो अशी परिस्थिती, या पार्श्वभूमीवर भामाशाहांची दाननिष्ठा तेजाने उभी राहते. 'केवळ पैशांच्या कमतरतेमुळे महाराणांना झुकावे लागेल, असे मी घडू देणार नाही,' हा निर्धार कर्तव्यभावना, राष्ट्रनिष्ठा आणि त्याग यांचे दर्शन घडवतो. योग्य ध्येयासाठी केलेले समर्पण किती प्रभावी असते, हे ही कथा सांगते.

**१२. बलिदान –** बालवयातील धर्मसंरक्षणाचा संकल्प, नालंदेसारख्या प्रबळ केंद्रात सत्यासाठी केलेला संघर्ष आणि जैन धर्माच्या रक्षणासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान, यामुळे अकलंक आणि निकलंक यांची कथा प्रेरणादायी ठरते. ही कथा केवळ धैर्याची नाही, तर अढळ श्रद्धा, तर्कशक्ती, धर्मनिष्ठा आणि समर्पणाची आहे. संकटासमोर न डगमगता 'जैनं जयतु शासनम्' हा निर्भय भाव जपणाऱ्या या वीर बंधूंचे चरित्र वाचकांना प्रेरित करते.

**१३. कणकेचा कोंबडा –** अहिंसा म्हणजे भ्याडपणा नव्हे; ती विवेकपूर्ण आणि सामर्थ्यवान जीवनदृष्टी आहे, हा या कथेतून स्पष्ट होणारा मूलभूत विचार आहे. आपल्या भूमिकेला आणि जबाबदारीला अनुसरून राज्य, संस्कृती, लोकांचे आणि स्वतःचे रक्षण करणे आवश्यक कर्तव्य असते. अशा वेळी विरोधी हिंसेपासून मागे हटणे अहिंसा नसून भ्याडपणा ठरतो. राजा मरीदत्ताची महत्त्वाकांक्षा, अभयरुची–अभयमती यांचे समत्व आणि भाव–हिंसेचे सूक्ष्म तत्त्व या कथेत प्रभावीपणे मांडले आहे.

**१४. जबाबदार कोण? –** माझ्या दुःखाला जबाबदार कोण – देव, नशीब, इतर लोक की मी स्वतः? या प्रश्नातून आत्मपरीक्षणाला प्रवृत्त करणारी कथा सुरू होते. अकृतपुण्याच्या दुःखमय जीवनातून आपल्या चांगल्या–वाईटासाठी आपण स्वतःच जबाबदार असतो, हे कर्मसिद्धांताचे गहन तत्त्व उलगडते. पुढे धन्यकुमाराच्या कथेत हेच तत्त्व अधिक तेजस्वीपणे प्रकट होते.

**१५. पार्श्वनाथ (भाग–१) –** मरुभूती आणि कमठ – पूर्वभव – क्रोध क्षणिक असू शकते, पण सूड जीवाला अनेक जन्मांपर्यंत बांधून ठेवू शकतो, हे या कथेतून दिसते. एका बाजूला कमठाचा सूड, मत्सर आणि पतन आहे, तर दुसऱ्या बाजूला मरुभूतीची क्षमा, समता आणि सातत्याने होणारी आध्यात्मिक उन्नती आहे. दोन भावांची ही कथा सूड आणि क्षमा, पतन आणि प्रगती, क्रोध आणि समता यांतील गहन फरक दाखवते.

**१६. पार्श्वनाथ (भाग–२) –** गर्भ, जन्म आणि तप कल्याणक – रत्नवृष्टीने सजलेली वाराणसी, सोळा स्वप्नांनी पावन झालेले गर्भ कल्याणक, सौधर्म इंद्राने केलेला जन्माभिषेक आणि शेवटी सर्व वैभवाचा त्याग करून स्वीकारलेला संयमाचा मार्ग, या प्रसंगांतून भगवान पार्श्वनाथांचे चरित्र भक्तिभावाने उलगडते. देवांचा उत्सव, इंद्र–इंद्राणीचा भक्तिभाव, नाग–नागिणीवर दाखवलेली करुणा आणि मनुष्यजन्मातील संयमाची महान क्षमता हा भाग प्रेरणादायी बनवते.

**१७. पार्श्वनाथ (भाग–३) –** ज्ञान आणि निर्वाण कल्याणक – प्रचंड वादळ, मुसळधार पाऊस, धगधगती आग आणि दगडांचा वर्षाव, या उपसर्गातही मुनी पार्श्वनाथ अचल ध्यानात स्थिर राहतात – ना राग, ना द्वेष; केवळ पूर्ण समता. धरणेंद्र–पद्मावतीचे उपसर्ग निवारण, संवर देवाचा पश्चात्ताप, केवलज्ञान, समवशरण, जिनवाणी आणि मोक्ष कल्याणकाचा मंगल क्षण या भागात अनुभवायला मिळतो. सूड जीवाला भटकवतो, तर क्षमा, आत्मचिंतन आणि समता सिद्धत्वाच्या शिखरापर्यंत नेऊ शकतात, हा या कथेचा संदेश आहे.

**१८. चंदनबाला –** राजकन्या असूनही अपहरण, फसवणूक, लिलाव, अपमान, खोटा आरोप आणि बेड्या अशा संकटांतून जाणारी चंदनबाला शील, ब्रह्मचर्य आणि आपल्या तत्त्वांवर अढळ राहते. ही केवळ दुःख सहन करण्याची कथा नाही; ती अंतर्बळ, चारित्र्य, संयम आणि अखंड श्रद्धेची प्रेरणादायी गाथा आहे. मुनिराज वर्धमानांना नवधा भक्तीने आहार देण्याची निर्मळ भावना आणि बेड्या

तुटण्याचा प्रसंग मनाला खोलवर स्पर्श करतो.

**वाचनातून संवाद, संवादातून संस्कार –**

कॉमिक्सची खरी उपयुक्तता केवळ PDF डाउनलोड करण्यात नाही, तर त्या कशा वाचल्या जातात यामध्ये आहे. मुलांना 'वाच' असे सांगण्यापेक्षा, त्यांच्यासोबत बसून कथा अनुभवणे अधिक परिणामकारक ठरते. चित्रे, संवाद आणि पात्रांच्या कृती पाहताना त्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतात; हेच प्रश्न पुढे स्वाध्याय आणि चिंतनाची सुरुवात बनू शकतात.

**कुटुंबात वाचन कसे करावे ?**

पालक, आजी-आजोबा किंवा मोठी भावंडे मुलांना एक कॉमिक्स वाचून दाखवू शकतात. कथेनंतर मोठा उपदेश न करता एखादा साधा प्रश्न विचारावा,- 'या कथेत तुला कोणता गुण आवडला ?,' 'आपण त्या जागी असतो तर काय केले असते ?,' 'आपण आपल्या जीवनात हा विचार कसा वापरू शकतो ?' अशा संवादातून कथा केवळ मनोरंजन न राहता जीवनाशी जोडली जाते.

**पाठशाळेत उपयोग कसा करावा ?**

दर महिन्याला एक कॉमिक्स निवडून मुलांना आधी घरी वाचायला सांगता येईल. पुढील वर्गात १०-१५ मिनिटांची चर्चा, प्रश्नोत्तरे, कथासार, छोटा अभिनय, चित्रकला किंवा लेखन उपक्रम घेता येईल. प्रत्येक कॉमिक्समधून एक तत्त्व निवडता येईल - अहिंसा, क्षमा, संयम, दान, वैराग्य, समता, शील किंवा कर्मसिद्धांत. त्यामुळे पाठशाळा केवळ पाठांतरापुरती न राहता विचारप्रवर्तक अनुभव बनेल.

**ही कॉमिक्स कोणासाठी आहेत ?<br>मुले, पालक, ज्येष्ठ श्रावक व<br>जैनधर्माची प्राथमिक ओळख<br>घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक वाचकांसाठी**

**मंदिर, समाज आणि कार्यक्रमांमध्ये उपयोग –**

मंदिर, ग्रंथालयात या कॉमिक्सच्या छापील प्रती ठेवता येतील. बालसभा, शिबिरे, स्पर्धा, दशलक्षण पर्व, महावीर जन्मकल्याणक किंवा इतर धार्मिक प्रसंगी मुलांना बक्षीस म्हणूनही या कॉमिक्स देता येतील. सुट्टीच्या दिवसांत मुलांना अर्थपूर्णपणे गुंतवण्यासाठीही हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. एक कॉमिक्स अनेक घरांमध्ये फिरू शकते, एक लिंक अनेक कुटुंबांपर्यंत पोहोचू शकते आणि एक कथा अनेक मुलांच्या मनात जैन तत्त्वांची पहिली ओळख निर्माण करू शकते.

**अनामिक 'गुप्तदान' –**


जैन कॉमिक्सचा मराठी अनुवाद आणि आधुनिक डिजिटल कलाकृती अनामिक 'गुप्तदान' भावनेतून साकार झाली आहे. या कार्यामागे व्यावसायिक हेतू, नफा, जाहिरात किंवा वैयक्तिक श्रेयाची भावना नाही. जैन धर्म, जैन कथा आणि जैन तत्त्वे अधिकाधिक लोकांपर्यंत, विशेषतः नव्या पिढीपर्यंत, सोप्या आणि आकर्षक पद्धतीने पोहोचावीत, हीच या उपक्रमाची मूळ प्रेरणा आहे.

**नि:शुल्क PDF डाउनलोड –**

भारतातच नव्हे, तर जगभरातील जैन कुटुंबे, मुले आणि अभ्यासक यांच्यापर्यंत PDF सहज पोचू शकतात. PDF स्वरूपामुळे मोबाइल, टॅबलेट, लॅपटॉप किंवा संगणकावर या कॉमिक्स कुठेही आणि कधीही वाचता येतात. **छापील प्रत हवी असल्यास PDF डाउनलोड करून आपल्या नजीकच्या प्रिंटरकडून रंगीत प्रिंटही काढता येईल.**

**जैन कॉमिक्स कोठून डाऊनलोड करावेत ?<br>https://jaincomics.wordpress.com/**

जैन कॉमिक्स या डाउनलोड करून विसरण्यासाठी नाहीत; त्या वाचण्यासाठी, मुलांना वाचून दाखवण्यासाठी, चर्चा करण्यासाठी आणि पुढच्या पिढीपर्यंत जैन तत्त्वज्ञानाचा सुंदर चित्रमय प्रकाश पोहोचवण्यासाठी आहेत. चला, या उपक्रमाला घराघरांत, पाठशाळांत आणि समाजात स्थान देऊया. कथा वाचूया, विचार जागवूया आणि संस्कारांचा हा चित्रमय सेतू अधिकाधिक कुटुंबांपर्यंत पोहोचवूया.




**सन्मती मासिकावरील पहिली पीएच. डी. पूर्ण...**

# मराठी जैन मासिक 'सन्मति'मधील कथांचा चिकित्सक अभ्यास (१९५० ते २०००)

**संशोधक श्री. संदीप धन्यकुमार आंबेकर, जिंतूर**
**संपर्क : ९४२२५५८६०२**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी करिता दिनांक : २३ एप्रिल २०२६, गुरूवार, दुपारी १.०० वाजता मौखिक परीक्षा संपन्न झाली. संशोधनाचा विषय होता.– **मराठी जैन मासिक 'सन्मति'मधील कथांचा चिकित्सक अभ्यास (१९५० ते २०००)**

**संशोधक श्री. संदीप धन्यकुमार आंबेकर, जिंतूर** यांनी शोधप्रबंध सादर केला. ते एक प्राथमिक शिक्षक असून स्वाध्यायी आहेत. शाळेतील सर्व जबाबदारी सांभाळून त्यांनी हे कष्टप्रद कार्य केले आहे, त्यामुळे ते विशेष कौतुकास पात्र आहेत. त्यांचे **मार्गदर्शक प्रा. डॉ. उद्धव गो. थोरवे, प्राचार्य, मराठी विभाग प्रमुख, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना** हे होते. बहिःस्थ परीक्षक म्हणून डॉ. शिवाजी नागरे, मराठी विभाग प्रमुख, शंकरराव खंडेलवाल महाविद्यालय, अकोला, जि. अकोला यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. पीएच. डी. पदवीच्या मौखिक परीक्षा समितेचे अध्यक्ष म्हणून डॉ. रमेश जाधव, मराठी विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी अनमोल सहकार्य केले. श्री. संदीप आंबेकर यांचे विशेष अभिनंदन...!!! –संपादक

**प्रस्तावना :**

देश, समाज, धर्म कुठलाही असो त्याच्या उत्थानात, पालन–पोषणात व विकासात नियतकालिकांचा सहभाग, त्यांचे योगदान उल्लेखनीय तर आहेच, पण अविभाज्य ही आहे. नियतकालिकांच्यां स्थापनेमागचा हेतूच सामाजिक भान जागृत ठेवण्याचा आहे. वर्तमानपत्रे, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, अर्धवार्षिक, वार्षिक इत्यादी नियतकालिकांच्या अस्तित्वामुळे आजवर समाजाला आपले खरे रूप कळत आले आहे. समाजमनाची गरज, समाजातील उणिवा, समाजातील समस्या, त्यावर उपाय, समाजातील कार्य यासारख्या बाबींवर हा नियतकालिकांचा डोलारा उभा आहे. नियतकालिके ही समाजाला आरसा दाखवण्याचे आपले कार्य यथासांग पार पाडत आली आहे. हळूहळू ही पत्रे आपले म्हणणे मांडण्यासाठी काही सामाजिक संस्थांनी स्वीकारली, ही पत्रे आता मुखपत्रे म्हणून समाजात पोहचत आहेत. मनुष्य जीवनात योग्य ते वर्तन बदल घडवून उद्धार करण्याचे कार्यही सामोपचाराने ही नियतकालिके पार पाडत आली आहेत, असे वर्तन बदल घडवून आणण्याच्या व नीतिविचार रुजविण्याच्या या कार्यात नियतकालिकांना मदत कथा या वाङ्मय प्रकारातून झाली आहे.

कथा हा वाङ्मय प्रकार दीर्घकाळापासून आपले अस्तित्व जपत आला आहे. या वाङ्मय प्रकाराला दीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. कथा साहित्याची प्रबोधन, श्रवणीयता आणि मनोरंजन ही काही ठळक आणि महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. हा साहित्यप्रकार कसा समजून घ्यायचा याचा ऊहापोह

आपण मागील सहा प्रकरणांच्या माध्यमातून केला आहे. त्यावरून मुख्यत्वे करून आपल्या असे लक्षात आले की, व्यक्ती आपले दैनंदिन जीवनातील अनुभव, या अनुभवाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कल्पना इतरांना सांगण्याचा प्रयत्न करीत गेला, ज्यातून कथेचा जन्म झाला. कथा या शब्दाचा अर्थ कहानी, गोष्ट, हकीकत, अनुभव वर्णन इत्यादी असा आहे. प्रथमतः मौखिक आणि नंतरच्या काळात छापील स्वरूपात कथा जनमानसात लोकप्रिय झाली. अशा ह्या श्रवणीय, वाचनीय कथांच्या माध्यमातून मनोरंजन व प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे बोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अगदी सुरुवातीच्या काळात एखादी शिकवण देण्यासाठी, बोध देण्यासाठी कथा सांगितली जाऊ लागली. मौखिक परंपरेतून जन्माला आलेली कथा नंतर लिखित स्वरूपात स्थिरावलेली आपल्या निदर्शनास येते.

भारतीय साहित्यामध्ये कथा या साहित्यप्रकाराला फार मोठे मानाचे स्थान आहे. कथेच्या रचनेचा विचार केला तर कथेमध्ये कथानक असते, घटना असतात, पात्र असतात, स्थळ काळ याचाही उल्लेख कथेमधून मिळतो. कथेच्या आशयाला अनुसरून त्यामध्ये विशिष्ट वातावरण निर्मिती केलेली असते. समर्पक अशी निवेदन शैली असते. कथेतील पात्राच्या संबंधातून निर्माण होणारा ताणतणाव, गुंतागुंत, आनंदही कथेत असतो आणि या सर्वांना कथेच्या शेवटी एका निष्कर्षाप्रत आणून कथेचा उत्कर्ष बिंदू गाठला जातो. कथेच्या शेवटी वाचकाला कथेचे एक तात्पर्य अथवा एखादी शिकवण मिळते, हे आपल्या लक्षात आले आहे. प्रत्येकच कथेत वरती उल्लेखित सर्वच घटक असतील असे नाही किंवा प्रत्येकाचे प्रमाण समान असेलच असे नाही. कधी कधी पात्रांना, कधी घटनांना, कधी आशयाला, कधी लेखकाला तर कधी भाषेला प्राधान्य असू शकते. मुख्यत्वेकरून यापैकी एखाद्या घटकाला प्राधान्य देऊन नंतर इतर घटकांचा सहयोगी अथवा सहकार्य म्हणून वापर केलेला दिसून येतो. थोडक्यात, कथेमध्ये केवळ प्रसंगाचे वर्णन, केवळ व्यक्ती चित्रण निव्वळ दृष्टिकोन अथवा केवळ एखाद्या विचारांची मांडणी नसते, तर कथा म्हणजे या सर्वांचे कमी-अधिक उपस्थितीने तयार झालेले मिश्रण होय. मौखिक स्वरूपात असलेली कथा छपाईच्या शोधानंतर बऱ्याच लोकांपर्यंत सहज पोहोचली.

सन्मति मासिकाच्या इसवी सन १९५० ते २००० या पन्नास वर्षाच्या कालावधीमधील कथा वाङ्मय यापक स्वरूपाचे आहे. सन्मति-मासिकांमधून प्रकाशित केलेल्या कथा विविध स्वरूपाच्या व मानवी मनातील विविध प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. विविध प्रसिद्ध लेखक तसेच नवोदित लेखक यांच्या माध्यमातून सन्मति मासिकातील हे कथा वाङ्मय समृद्ध झालेले दिसून येते. सन्मति मासिकांमधून प्रकाशित कथा साहित्यामध्ये विषयाची व कथानकाच्या आशयाची विविधता दिसून येते. रचनातंत्राचे, निवेदन शैलीचे विविध प्रयोग कथाकारांनी केलेले निदर्शनास येतात. मनुष्य जीवनातील प्रत्येक क्षेत्राशी निसर्ग, प्राणी, पक्षी यांच्या संदर्भातील तसेच इतर घडामोडीशी या कथा वाचकाचा संपर्क घडवून आणणाऱ्या आहेत. मानवी मनातील जाणीव नेणीवेच्या पातळीशी मानवी भावनांचा संबंध जोडणाऱ्या कथा असल्याचे जाणवते. हे कथा वाङ्मयविषयक अभिरुची निर्माण करण्यास पोषक आहे. अशा कथा समृद्धीमुळे सन्मति मासिकाने मराठी नियत-कालिकाच्या विश्वामध्ये आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. साहित्याच्या क्षेत्रामध्ये वाङ्मयीन नियतकालिक किती उत्तम दर्जाचे कार्य करु शकते, याचे आदर्श उदाहरण म्हणून आपण सन्मति मासिकाकडे पाहू शकतो. सन्मति या मासिकाने आपल्या १९५० ते २००० या (अभ्यास कालावधी विशेष संदर्भ) पन्नास वर्षाच्या कालखंडामध्ये व्यापक स्वरूपाचे कार्य करून मराठी वाङ्मय समृद्ध केलेले दिसून येते.

**अभ्यास विषयाची निवड :**

प्रस्तुत प्रबंध लेखनात अभ्यासकाने **मराठी**

**जैन मासिक सन्मतीमधील कथांचा चिकित्सक अभ्यास (१९५० ते २०००)** हा विषय निवड करण्यामागे हा हेतू आहे की, जैन मराठी साहित्य हे सुरुवातीपासूनच दुर्लक्षीत आहे. मराठी भाषा अभ्यासकांनी जैन मराठी साहित्याचा आढावा घेतला नाही. जैन साहित्यिकांनी मराठी वाङ्मयाच्या सर्व क्षेत्रात कामगिरी केली आहे. कथा वाङ्मय प्रकार ही त्यांनी हाताळला आहे. यासाठी त्यांना काही प्रमाणात मदत झाली ती जैन मासिकांची. मराठी जैन मासिक 'सन्मति' हे असेच एक जैन मासिक ज्याने जैन साहित्यिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

'सन्मति' मासिकाने केलेले वाङ्मयीन कार्य मराठी साहित्याच्या मापदंडावर तर खरे उतरतेच. तसेच मानवतावादी दृष्टिकोनातूनही ते समृद्ध असल्याचे जाणवते. **किशोरकुंज** (ऑगस्ट १९६४), **भद्रकथाकुंज** (मे १९६५), **सद्बोध दृष्टांतमाला** (ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७७) या सदरामधून बालकांसाठी, किशोरांसाठी, मानवतावादी, सुसंस्कृत, सुशिक्षित बनण्यासाठी बोधकथा प्रकाशित केल्या आहेत. शिवाय **पंडितजीचा बटवा** या सदराच्या माध्यमातून जीवनात येणारी संकटे, अडचणी, अडथळे आपण सहज संयमाने दूर करू शकतो याची प्रचिती येते.

**उद्बोधन** या सुभाषिताच्या सदरातून मानवी जीवनाला अस्थायी परिस्थितीमध्ये स्थिर होण्याचे बळ देण्याचे कार्यही सन्मति मासिकाद्वारे केलेले निदर्शनास येते. याशिवाय विशेषांकांच्या माध्यमातून सर्व कलाप्रकारांचा, साहित्यप्रकारांचा, समाजश्रेष्ठींच्या जीवनकार्याचा, वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाच्या जीवन प्रवासाचा परिचय करून दिला. मानवी जीवन भरकटवणारे अनिष्ट साहित्य प्रकाशित न करता केवळ सात्त्विक करमणूक म्हणून जीवनाशी निगडित असलेल्या प्रश्नांची कथा या वाङ्मय प्रकाराद्वारे ओळख करून देऊन, मानवी विचार उन्नत बनवून त्याद्वारे मानवी जीवन उन्नत बनविण्याचे कार्य 'सन्मति' मासिकाने केलेले दिसून येते.

सन्मति मासिकाने आपल्या ७५ वर्षाच्या कारकीर्दीमध्ये जाणीवपूर्वक मराठी भाषेची सेवा केली. जैन धर्माची तत्त्वे व सत्वशील परंपरा मराठी भाषेच्या माध्यमातून समाज जीवनामध्ये रुजवण्याचे कार्य केले आहे. हे कार्य करण्यासाठी कथा या वाङ्मयप्रकाराची मदत झाली. त्यामुळे 'सन्मति' मासिक व त्यामधून प्रकाशित कथांचा अभ्यास होणे व 'सन्मति' मासिकाचा बीज-अंकुर-रोपटे-वृक्ष हा प्रवास अभ्यासणे गरजेचे वाटले. 'सन्मति' मासिकाने आपल्या ज्ञानदानाच्या व नीतीविचार रुजविण्याच्या कार्यात कथांचा उपयोग केला. ह्या कथांचा अभ्यास व मूल्यमापन व्हावे म्हणून हा अभ्यास विषय निवडण्यात आला आहे.

**अभ्यासविषयाची व्याप्ती :-**

या संशोधनकार्यात 'सन्मति' मासिकामधून प्रकाशित कथांचा चिकित्सक अभ्यास करणे अपेक्षित होते, त्यानुसार अभ्यास केला गेला आहे. विषयाच्या व्याप्तीचा विचारकरिता सन १९५० ते २००० या कालखंडातील 'सन्मति'मधून प्रकाशित कथांचा अभ्यास करण्यात आला आहे. या कालखंडामध्ये प्रकाशित अंक व जैन साहित्य प्रमाणभूत मानण्यात आले आहे.

**कथावाङ्मय - अभ्यासाचे स्वरूप :**

साहित्याची मूल्ये ही जीवनमूल्यांशी एकरूप असतात, हे आता सर्वमान्य झाले आहे. मनुष्य हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक असल्यामुळे साहित्याला त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. मानवी जीवनातील आनंद, दुःख, संघर्ष यांच्या चक्रात अडकून मनुष्य जीवनाची ससेहोलपट होत असते. ही सर्व चक्रे मानवाने निर्माण केलेली असल्यामुळे त्यापासून मुक्तीचे सामर्थ्य हे मानवाजवळ आहे. यासाठी साधन म्हणून तो साहित्याचा उपयोग करतो. मग असे साहित्य उच्च मूल्यांचे व उच्च दर्जाचे हवे. नाहीतर मनुष्य या चक्रात आणखीनच गुरफटून जाईल.

अशा परिस्थितीमध्ये त्याला मदत होते ती

साहित्याची. साहित्यप्रकारामध्ये कथा साहित्य अशा कार्यात खूप उपयोगी असते. 'सन्मति' मासिकातून प्रकाशित कथासाहित्य त्या दर्जाचे आहे. कथेतील जीवनानुभव हे वाचकाला सुखावणारे तर आहेच. तसेच उन्नतीकडे नेणारे ही आहे. कथेतून येणारी मराठी भाषा व त्या अनुषंगाने येणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार, सुंदरवाक्य, शब्द यांचा वाचकाला फायदा होतो. हे साहित्य मनुष्याला उन्नत व प्रगत बनविण्यास सार्थ ठरते, हेच साहित्याच्या वाङ्मयीन विचारांचे शाश्वत मूल्य आहे. त्यामुळे 'सन्मति' मासिकातून प्रकाशित कथांचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्यात आले आहे.

**प्रकारणनिहाय विभागणी–**

**प्रकरण १ले – 'सन्मति' मासिकाचा उदय व विकास**

अ) मासिकाची प्रेरणा

आ) मासिकाची पूर्वतयारी व अवतरण

इ) 'सन्मति' मासिकाची ध्येय, धोरणे व उद्दिष्टे

ई) संस्थापक संपादकाविषयी (ब्र. माणिकचंद भीसीकर गुरुजी)

'सन्मति' मासिकाची प्रेरणा म्हणजे गुरुदेव समंतभद्र महाराज आहेत. त्यांच्याच प्रेरणेने जैनधर्माच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी तसेच समाजाला उन्नत विचारांचे दर्शन घडविण्यासाठी भीसीकर गुरुजी यांनी 'सन्मति' मासिकाची सुरुवात केली. 'सन्मति' मासिकाची सुरुवात करीत असताना आलेल्या अडचणी व त्यावर उपाययोजना करून 'सन्मति' मासिक सुरु करण्यात आले. 'सन्मति' मासिकाची पूर्वतयारी म्हणून मासिकाची ध्येय, धोरणे व उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. संस्थापक संपादक माणिकचंद भीसीकर यांच्या निःस्वार्थ जीवनकार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार वरील उपमुद्यांच्या आधारे आढावा सदर प्रकरणामधून घेण्यात आला.

**प्रकरण २ रे – 'सन्मति'मधील कथांचे वर्गीकरण**

अ) अनुवादित कथा

आ) पौराणिक कथा

इ) सामाजिक कथा

ई) ऐतिहासिक कथा

उ) धार्मिक कथा

ऊ) चातुर्य कथा

कथा सुरुवातीच्या काळापासून सर्वांच्या आवडीचा विषय आहे. कथेमध्ये काळाप्रमाणे बदल होत गेले. पिढ्यान्‌पिढ्या बदलत असताना कथेतही बदल होत गेले. 'मौखिक स्वरूपातील कथा ते आजचे स्टोरीटेलिंगॲप' अशी बरीच स्थित्यंतरे कथा ह्या वाङ्मयीन प्रकाराने अनुभवली आहेत. कथा विविधरूपात, प्रकारात विविध माध्यमातून आपल्यापर्यंत पोहचली.

प्रत्येक कुळात अथवा वर्गात गुणांनी समान कथा जमा करायच्या व कोणते गुणसमान आहेत, ते तसे का वाटतात? याचे वर्णन त्यामध्ये असावयास हवे. साहित्याच्या वर्गीकरणामध्ये या सर्व तत्त्वांचे पालन करून वर्गीकरण केले जाते. वर्गीकरणामुळे कथांचा अभ्यास करणे सोयीस्कर होते.

'सन्मति' मासिकातही विविध कथा–प्रकारांचा वापर करण्यात आला आहे. कथा वाचून त्याचे कथाप्रकारांच्या वैशिष्ट्याप्रमाणे योग्य कथाप्रकारामध्ये वर्गीकरण केले. मराठी जैन मासिक 'सन्मति'मधील कथांचे वर्गीकरण त्यात दिसून येणाऱ्या गुणांच्या, तत्त्वांच्या, स्थलकालाच्या आणि साहित्यकृतीच्या आधारे अनुक्रमे वरीलप्रमाणे करून, त्याचा अभ्यास करण्यात आला, ज्याचा उपयोग संशोधकास प्रबंध लिहिताना झाला.

**प्रकरण ३ रे – 'सन्मति'मधील कथांचे समीक्षण**

अ) कथेचे स्वरूप

आ) कथेतील व्यक्तिरेखा

इ) कथेतील भावनाविष्कार

ई) कथेतून प्रतिबिंबित इतर धर्मियांचे तत्त्वज्ञान

उ) कथाकारांच्या कथा लेखनाच्या मर्यादा

ऐ) कथांचे विशेष सदर

वरील मुद्यांचा विचार करून म्हणजेच कथेचे स्वरूप, कथेतील व्यक्तिरेखा, त्या व्यक्तिरेखांचे भावनाविश्व, कथेतून आलेले इतर

धर्मियांचे तत्त्वज्ञान, कथा लिहित असताना लेखकांना पडलेल्या मर्यादा व 'सन्मति'मधून चालवले गेलेले विशेष सदर या आधारे समीक्षण केले असता असे लक्षात येते की, 'सन्मति' मासिकाची धर्म प्रसारा-प्रचारासाठी जरी सुरुवात झाली असली तरी, त्यासोबतच वाड्मय मूल्यांची जोपासना ही यथायोग्य केली आहे. मनोरंजनपर मजकुरापेक्षा प्रबोधनपर मजकुराला महत्त्व दिलेले दिसून येते.

कथांचे आकृतीबंध योग्य असून त्यातून मानवी जीवनाचा सर्वांगीण आढावा घेण्यात आला आहे. कथांच्या माध्यमातून केवळ जैन धर्माच्या तत्त्वज्ञानाला स्थान न देता इतरही धर्माच्या तत्त्वज्ञानाला स्थान देण्यात आले आहे. यावरून वाचकाला तसेच समाजाला सर्वधर्म समान असल्याचा संदेश पोहचतो. आज धर्मा-धर्मामधे आलेले वितुष्ट लक्षात घेता, अशाप्रकारच्या कथा वाचकांसाठी मार्गदर्शक ठरतात.

**प्रकरण ४ थे – 'सन्मति'तील प्रकाशित कथांमधून प्रतिबिंबित जैन तत्त्वज्ञान व आचारधर्म :**

अ) अहिंसा, आ) अपरिग्रह (संचय न करणे), इ) अनेकांत, ई) सत्य, उ) अचौर्य, ऊ) सदाचार, ए) शील, ऐ) ब्रह्मचर्य

मुळातच कथेचा जन्म हा नितीविचार रुजविण्यासाठी झालेला असल्याकारणाने जैन धर्मातील तत्त्वज्ञान व आचारधर्म वाचकापर्यंत कथेच्या माध्यमातून सन्मति मासिकाने पोहचविला आहे. जैन धर्माचे तत्त्वज्ञान कथांच्याद्वारे व इतर साहित्याच्याद्वारे मांडण्यात आले आहे. अहिंसा, अचौर्य, अपरिग्रह, ब्रह्मचर्य, सत्य या तत्त्वांची मांडणी कमी-अधिक प्रमाणात सर्वच कथांमधून येते. कथा जरी १९५० ते २००० या काळातील असतील तरीही आजच्या जीवनासाठी समकालीन वाटतात. या प्रकरणाच्या अंती असे लक्षात येते की, जैन धर्माच्या तत्त्वज्ञानाची उपयोगिता तत्कालीन व समकालीन अशा दोन्हीप्रकारे आहे. जैन धर्माच्या आचारधर्माचे पालन समाजातील सर्वांनी केल्यास समाज सुदृढ व उन्नत घडण्यास मदत होईल. समाजामध्ये असणारी अनैतिकता सहज दूर होईल.

**प्रकरण ५वे – 'सन्मति'तील प्रकाशित कथांची दार्शनिकता**

अ) कथांमधील समाजदर्शन

आ) कथांमधील धार्मिकदर्शन

इ) कथांमधील संस्कृतीदर्शन

कथा ही समाजाचे, धर्माचे, संस्कृतीचे यथायोग्य चित्रण करीत असते. समाजात घडलेल्या बाबींचे प्रतिबिंब कथांमधून दिसून येते. धार्मिक गोष्टींचा प्रभाव समाजावर व संस्कृतीवर पडतो. त्यामुळे कथांचा वरील मुद्याच्या आधारे अभ्यास करणे गरजेचे होते.

या प्रकरणाच्या शेवटी असे लक्षात आले की, तत्कालीन समाज हा दारिद्र्य, अंधश्रद्धा याने ग्रासलेला होता. धर्माबाबत जागरूकता आणण्याचे काम सन्मति मासिकातून कथांच्या आधारे करण्यात आले. असे करीत असताना भारतीय संस्कृतीचे दर्शन कथांद्वारे होते. दर्शन हा शब्द म्हणण्यास जितका सोपा आहे, तितकीच त्याची व्याप्ती जास्त आहे. दार्शनिक तत्त्वांच्या कसोटीवर घासल्यानंतर मिळणारे सत्य हे नेहमीसाठीच सत्य ठरते. दर्शन या विचार प्रक्रियेने व्यक्ती समाजाचे, धर्माचे, संस्कृतीचे, उन्नतीकडे पाऊल नेऊ शकतो. त्याचा विचार सन्मतितून प्रकाशित होणाऱ्या कथांमध्ये केलेला दिसून येतो. कारण त्यातूनच वाचकाची प्रगती, या माध्यमातून समाजाची उन्नती व संस्कृतीची जडणघडण होत असते.

एकंदरीत असे लक्षात येते की, समाज, धर्म, संस्कृती ह्या मानवनिर्मित बाबी आहेत. समाज, धर्म, संस्कृती ह्या मानवाला जन्मजात प्राप्त होतात, पण तरीही त्या त्याला आत्मसात कराव्या लागतात. समाज, धर्म, संस्कृती ह्या अमूर्त संकल्पना आहेत; ज्यांचे परिणाम मूर्त बाबीवर होत असतात. समाज, धर्म, संस्कृती ह्या संक्रमण पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचत असतात. यावरून असे म्हणता येईल की, समाज, धर्म, संस्कृती ही समूहाची निर्मिती आहे. ती

सामूहिक रूपानेच प्रगत होत जाते, परंतु त्याची जोपासना प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून असते. समाज, धर्म, संस्कृती मानवाच्या गरजपूर्तीचे माध्यम आहेत. समाज, धर्म, संस्कृती ह्या भिन्न रूपात आढळतात. तसेच त्या परिवर्तनशील आहेत. तरीही प्रत्येक समाज, धर्म, संस्कृतीला आपले विशेष अस्तित्व आहे, असे आपल्याला म्हणता येईल.

**प्रकरण ६ वे – 'सन्मति'तील प्रकाशित कथांचे वाङ्मयीन सौंदर्य**

अ) भाषा

आ) प्रतिमा

इ) शैली (मांडणी)

ई) संवादात्मकता

उ) लालीत्यपूर्णता

ऊ) म्हणी, वाक्प्रचार, सुंदरवाक्य

ए) प्रासादिकता (गोडवा)

कथा हा वाङ्मयीन प्रकार असल्यामुळे सन्मतिमधून प्रकाशित कथांचे वाङ्मयीन मूल्ये तपासणे गरजेचे होते. कथेमध्ये वापरण्यात येणारी भाषा, कथेमध्ये येणाऱ्या प्रतिमा, कथेचा आकृतिबंध, कथेमध्ये व्यक्त होण्यासाठी वापरण्यात आलेले संवाद. या सर्वांमधून निर्माण झालेली लालीत्यपूर्णता, कथेमध्ये घेणारी म्हणी, वाक्प्रचार, व सुंदरवाक्य आणि या सर्वांमधून निर्माण होणारा गोडवा. हे सर्व वाङ्मयीन कसोटीवर सिद्ध होणारे आहे.

सदर प्रकरणामध्ये कथेची वैशिष्ट्ये म्हणजे मनोरंजन, सुसंस्कार, उत्कंठा, एककेंद्रीपणा, भूतकाळ, जीवनवेध, सादरीकरण या आधारे समीक्षा केली आहे. तसेच कथेमधून निर्माण होणारे रस यांचाही आढावा घेतला आहे. याचसोबत भाषा म्हणजे काय? भाषेच्या रूपांचा म्हणजेच प्रमाणभाषा, बोलीभाषा, परभाषा, स्त्रीसुलभभाषा या मुद्यांच्या आधारे विचार केला आहे. प्रतिमा म्हणजे काय? प्रतिमांचे मानसिक पातळीवर संघटन कसे होते? त्यांचे रचनाबंध कसे आहेत? यांचा विचार केला गेला आहे. कथांची मांडणी कशी करण्यात आली आहे? कोणकोणत्या शैलींचा वापर करण्यात आला आहे? या बाबींचा सुद्धा आढावा सदर प्रकरणामधून घेण्यात आला आहे. इत्यादी बाबींचा सविस्तर विचार या प्रकरणामधून घेण्यात आला आहे.

**प्रकरण ७ वे – निष्कर्ष**

१. मागील सहा प्रकरणांच्या आधारे मिळणारे निष्कर्ष या शेवटच्या प्रकरणामध्ये मांडण्यात आले आहेत.

२. 'सन्मति' मासिकामधून प्रकाशित कथा ह्या मराठी वाङ्मयामध्ये भर घालणाऱ्या आहेत. कथांमध्ये वापरलेली भाषा, प्रतिमा, संवाद, म्हणी, वाक्प्रचार यातून निर्माण केलेली वाक्यरचना मराठी भाषेच्या सौंदर्यामध्ये भर टाकणारी आहेत. त्यामुळे 'सन्मति' मासिकामधून प्रकाशित कथांचे वाङ्मयीन मूल्य उच्च दर्जाचे ठरते.

३. 'सन्मति' मासिकामधून प्रकाशित कथांमध्ये वापरण्यात आलेली भाषा वाचकाला कथेशी जोडणारी आहे. कथांमध्ये वापरण्यात आलेली मराठी भाषेची रूपे म्हणजेच बोलीभाषा आणि प्रमाण भाषा यांचा पुरेपूर वापर झालेला दिसतो. त्यामुळे यातून मराठी भाषेची उपयोगिता लक्षात येते.

४. 'सन्मति' मासिकातील कथा ह्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व इतर सर्व प्रकारच्या क्षेत्रामध्ये वावर करताना दिसतात. या क्षेत्रांमध्ये घडणारे प्रसंग, घटना; त्यामुळे जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणी ह्या आपल्यासाठी परिचित आहेत. कथेमध्ये त्यावर काही उपाय सुचविलेले आहेत, जे आपणास ही मार्गदर्शक ठरतात. यावरून आपल्याला असे सिद्ध होते की, 'सन्मति' मासिकामधून प्रकाशित कथा जीवननिष्ठ आहेत.

५. 'सन्मति' मासिकामधून प्रकाशित कथांमधून येणारी काही पात्रे ही वास्तविक जीवनातील लोकांशी एकरूप होतात तर काही प्रतीकात्मक दिसून येतात. तसेच कथांमधील कथानकामुळे घटित होणारे प्रसंग; वास्तविक जीवनात येणाऱ्या प्रसंगाशी सामायिक होताना दिसतात. यावरून असे

सिद्ध होते की, ‘सन्मति’ मासिकामधून प्रकाशित कथा वाचकाला जीवनानुभव देणाऱ्या आहेत.

६. ‘सन्मति’ मासिकामधून प्रकाशित जवळपास सर्वच कथांचा शेवट हा नैतिकता प्रदान करण्याने होतो, म्हणजेच प्रत्येक कथेच्या शेवटी किमान एक तरी बोध प्राप्त होतो. यावरून असे सिद्ध होते की, ‘सन्मति’ मासिकामधून प्रकाशित झालेल्या कथा मनुष्यजीवनाला तसेच त्या अनुषंगाने समाज जीवनाला नैतिकता प्रदान करीत उन्नत जीवन जगण्यासाठी प्रेरित करतात.

७. जैन धर्माचे तत्त्वज्ञान कथांच्याद्वारे व इतर साहित्याच्याद्वारे मांडण्यात आले आहे. अहिंसा, अचौर्य, अपरिग्रह, ब्रह्मचर्य, सत्य या तत्त्वांची मांडणी कमी–अधिक प्रमाणात सर्वच कांमधून येते. कथा जरी १९५० ते २००० या काळातील असतील तरीही आजच्या जीवनासाठी समकालीन वाटतात.

८. आज जसे आपण पाहतो की, जगामध्ये युद्ध, पैश्याचा हव्यास, बलात्कार, चोरी–दरोडे यांचे वाढते प्रमाण, व्यसनी लोकांची संख्या जी दिवसेंदिवस वाढत आहे, स्वार्थासाठी लोक कोणत्याही थरावर जाण्यास तयार आहेत; अश्या अनैतिक परिस्थितीमध्ये जैन धर्माचे तत्त्वज्ञान आजच्या दिशाहीन जगाला मार्गदर्शन करण्यास उपयोगी आहे. यावरून असे सिद्ध होते की, जैन धर्माचे तत्त्वज्ञान कालातीत आहे.

९. केवळ जैन तत्वज्ञानच नव्हे तर इतरही धर्माचे म्हणजेच हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम धर्माचे तत्त्वज्ञान जे समाजाला उन्नत बनविण्यासाठी गरजेचे आहे, ते सर्व मांडण्याचा प्रयत्न ‘सन्मति’ मासिकामधून प्रकाशित कथांद्वारे केलेला दिसून येतो.

१०. जैन पुराणातील कथा त्यांचा आशय न बदलता वाचकांसाठी उपलब्ध केलेल्या आहेत. केवळ मराठीच नव्हे तर इतरही भाषांमधील म्हणजेच हिंदी, तमिळ, इंग्रजी, कन्नड भाषेमधील उत्कृष्ट कथा व इतर साहित्य मराठीमध्ये अनुवादित करून वाचकास उपलब्ध करून दिलेले आहे. यावरून असे लक्षात येते की, ‘सन्मति’ मासिकाने मराठी साहित्य समृद्ध करण्याचे काम केले आहे.

११. प्राचीन जैन मराठी साहित्याला प्रकाशित करून प्रकाशझोतात आणण्याचा सफल प्रयत्न केलेला दिसून येतो. **अपभ्रंश मराठी भाषा जी ‘जैन मराठी’** म्हणून ओळखल्या जात होती. त्या अपभ्रंश मराठी भाषेतील साहित्य आजच्या मराठी भाषेमध्ये वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

१२. स्त्रीचे अस्तित्व प्रत्येक कथेच्या माध्यमातून अधोरेखित झालेले दिसून येते. जैन पुराणातील कर्तबगार स्त्रियांची चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. समाजात दिसून येणारी स्त्रीयांची रूपे व त्यांची स्थिती, भूमिका, जबाबदारी, कर्तव्य, हक्क, सन्मान दर्शवण्यात आले आहेत. यावरून असे लक्षात येते की, समाजबांधणीतील एक महत्त्वाचा घटक म्हणून स्त्रीला कथांमधून स्थान देत आपली स्त्रीवादी भूमिका ‘सन्मति’ मासिक स्पष्ट करते.

१३. समाजामध्ये दिसून येणाऱ्या व्यक्ती, प्रवृत्ती, स्वभाव, राहणीमान, खानपान इत्यादी बाबी निर्देशित झालेल्या दिसून येतात. ‘समाजामध्ये असलेले दारिद्र्य जसे वाईट तसेच अतिश्रीमंतीही वाईटच’ हा मोलाचा सल्ला बऱ्याच कथांमधून दिलेला दिसून येतो. समाजामध्ये असणाऱ्या इष्ट आणि अनिष्ट अशा दोन्हीही प्रवृत्तीचे मंथन ‘सन्मति’ मासिकामधून प्रकाशित कथांमधून दिसून येते. यावरून असे लक्षात येते की, समाज बांधणी व त्याद्वारे राष्ट्रबांधणीचे कार्य ‘सन्मति’ मासिकाने केलेले आहे.

१४. **उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम्** या आपल्या ब्रीद वाक्याला नजरेपुढे ठेवून मानवाचे विचार उच्चप्रतीचे करण्याचे कार्य ‘सन्मति’ मासिकातून प्रकाशित कथा व इतर साहित्याच्या माध्यमातून यशस्वीपणे केलेले दिसून येते.

**सन्मती मासिकावरील या संशोधनपूर्ण कार्याबद्दल श्री. संदीप आंबेकर यांचे हार्दिक अभिनंदन..!!**



# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(लेख क्र. १४३)

आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी

श्रमण होऊ इच्छिणारा बंधुवर्गांचा निरोप घेऊन माता, पिता, पत्नी व मुलांच्या मोहातून स्वतःला सोडवून दीक्षा देणाऱ्या योग्य गुरूंचा शोध घेतो. गुरूंच्या चरणी स्वतःला समर्पित करून दीक्षा देण्याची विनंती करतो. गुरु सुद्धा शिष्याची पात्रता ओळखून त्याला स्वीकारतात व मागील गाथेत वर्णन केल्याप्रमाणे द्रव्यलिंग व भावलिंगाला ग्रहण करून तो यथार्थ श्रमण बनतो. अशा प्रकारे श्रामण्याची परिपूर्णता होते, हे या गाथेत सांगतात.

**आदाय तं पि लिंगं गुरुणा परमेण णमंसित्ता।**
**सोच्चा सवदं किरियं उवट्ठिदो होदि सो समणो।२०७।**

**अन्वयार्थ : (परमेण गुरुणा)** परम गुरूंनी दिलेल्या **(तं पि लिंगं)** त्या दोन्ही लिंगांना **(आदाय)** ग्रहण करून **(तं णमंसित्ता)** गुरूंना नमस्कार करून **(सवदं किरियं)** व्रत सहित क्रियेला **(सोच्चा)** ऐकून **(उवट्ठिदो)** आपल्या जवळ स्थित होत **(सो)** तो **(समणो)** श्रमण **(होदि)** होतो.

**तात्पर्य :** अंतरंग व बहिरंग लिंग ग्रहण करून गुरूंचा उपदेश ऐकून जो स्वस्थ होतो, तो श्रमण बनतो.

मुनिपद धारण करण्यास उत्सुक असणारा भव्यजीव योग्य गुरूंच्या शरणी जातो व त्यांच्या आज्ञेने वस्त्राभूषणाचा त्याग करून मस्तकाचे केस उपडून नग्न मुद्रा धारण करून मयूरपिंछी व कमंडलू ग्रहण करून द्रव्य लिंगधारी होतो. येथे हे प्रकरण सुरू आहे की जो श्रमण होऊ इच्छितो तो काय काय करतो ? जो समता परिणाम ठेवतो तो प्रथम बहिरंग व अंतरंग या दोन्ही लिंगांना ग्रहण करतो. बाहेरून नग्न दिगंबर परिग्रह रहित व आरंभ रहित बनतो. ज्याला समता परिणाम हवे आहे. त्यासाठी घर हे राग-द्वेषाचे मुख्य कारण आहे. घरातील संपर्क, बाह्य वातावरण हे सोडणे अत्यंत आवश्यक असते. आरंभ व परिग्रह हे देखील राग-द्वेषालाच कारण आहे. त्यांचा त्याग आवश्यक आहे. म्हणून तो सर्व परिग्रहांचा त्याग करून बहिरंग निर्ग्रंथ स्वरूप धारण करतो. समतेचे पुजारी असणारे मुनी अंतरंग वेश धारण करताना मूर्च्छारहित, आरंभरहित, मन-वचन-कायेची शुद्ध निर्मलता, पराच्या अपेक्षेने रहित निरपेक्ष मन हे अंतरंग लिंग आहे. अंतरंगामध्ये सहज परिणाम उत्पन्न झाल्याने भावलिंग आपोआपच ग्रहण होते. तेव्हा बहिरंग चिन्ह म्हणजेच शरीराची नग्नता व अंतरंग चिन्ह म्हणजे आत्म्याची मग्नता होय. जो पुरुष नग्न व शांत मुद्रा ठेवून विवेकपूर्ण कार्य करतो. त्याचा सर्व समाजावर विशेष प्रभाव होतो. असा हा निर्विकारी महापुरुष उग्र तपस्वी असतो. कोणत्याही प्रकारचे विकार उत्पन्न होत नाही, हे उत्कृष्ट वैराग्याचेच फळ होय.

**गुरूंना नमस्कृती-**

अरहंत भट्टारक हे मूळ परमगुरू आहेत. कारण त्यांनीच सर्वप्रथम स्वयं निर्ग्रंथ बनून दिव्यध्वनीच्या माध्यमाने निर्ग्रंथ मार्गाचा उपदेश दिला आहे. त्यांच्या या सन्मार्गाचे अनुसरण करणारे दीक्षादायक आचार्य हे दीक्षागुरु असतात. म्हणून साक्षात अरहंत देवानेच दिलेले हे व्रत आहे की, जे वर्तमानात आचार्यांच्या कडून व्रत दिले जात असते. गुरूंनी दीक्षा दिली म्हणजे जणू मोक्षपुरीला जाण्यासाठी नौकाच दिली होय. त्यामध्ये बसून भव्य जीव मोक्ष नगरीकडे प्रयाण करतो. संयमरूपी अनमोल रत्न देणारे गुरुदेव परम उपकारी असतात. म्हणून त्यांच्याविषयी परम भक्ती ठेवून तो भव्य जीव भावसहित नमस्कार करतो. ज्याप्रमाणे जगात एखाद्याने उपकार केल्यावर त्यांच्याप्रती कृतज्ञतेचे भाव सहजतेने असतातच त्याचप्रमाणे दीक्षा देणाऱ्या गुरूंच्या विषयी उपकाराचे भाव ठेवून प्रसन्नतापूर्वक

कृतज्ञतेने भारावून जातो. मन-वचन-कायेच्या शुद्धीने भाव नमस्कार करतो. अंतरंगात एक विलक्षण बहुमान असतो. हा धर्मानुरागरूप परिणाम शिष्यांच्या अंतरंगात सहजतेने निर्माण होत असतो. गुणांचे स्मरण करून आत्महिताच्या भावनेने गुरुजी समरस होऊन अंतरंगातील विनयपूर्वक भावस्तुतीने प्रसन्न होतो. ज्याप्रमाणे स्वामींशी एकनिष्ठ असणारा सेवक मालकाची आज्ञा मिळताच ते शिरोधार्य मानून कर्तव्यपूर्तीने कृतकृत्य होतो. त्याप्रमाणे शिष्य देखील गुरूंच्या प्रती भावस्तुती व वंदना करून गद्‌गदित होत असतो. आत्महितैषी श्रावक गुरूंचे वारंवार आभार मानत असतो. यास सीमाच नसते. अशा निसीम परम भक्तीचा पाझर त्याच्या मनातून निरंतर वाहत असतो.

ज्याप्रमाणे भौऱ्यामध्ये नाव अडकली असेल, गटांगळ्या खात असेल, अशा संकटकाळी कोण्या एका माणसाने ती नाव भौऱ्यातून सुटका केली. संकटातून बाहेर काढले तर त्या नावेतील मनुष्य सुटकेचा श्वास घेतो आणि ज्याने वाचवले त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतो. त्याने माझी रक्षा केली, मला संकटातून वाचवले, हे नेहमी लक्षात ठेवतो. त्याप्रमाणे संसार संकटातून वाचवणारे मोक्षमार्गामध्ये लावणारे असे जे दीक्षागुरु असतात. त्यांना पिता समजून प्रभू समान कृतज्ञतेचे भाव व्यक्त करतो. हे त्या शिष्याचे स्वाभाविक गुणधर्मच आहेत.

**व्रतसहित क्रियांचे श्रवण-**

गुरु त्याला सर्व सावद्ययोगाचे त्यागरूप एका सामायिक महाव्रताचे स्वरूप सांगतात. तो ऐकणे रूप श्रुतज्ञानाने सहित होऊन आपल्या आत्म्याला जाणत सामायिकामध्ये मग्न होतो. अर्थात सामायिक संयमाला प्राप्त होतो. त्यानंतर श्री गुरु प्रतिक्रमण, आलोचना व प्रत्याख्यान या क्रियेचा उपदेश देतात. मन-वचन-काय, कृत-करीत-अनुमोदना याने तीन लोक व तीन काळामध्ये सर्व शुभ कर्मापासून भिन्न निज शुद्ध आत्म्यामध्ये मग्न राहत क्रियेचे आचरण करतात. त्यालाच बृहत् प्रतिक्रमण क्रिया असे म्हणतात. या सर्व क्रिया ऐकून श्रुतज्ञानाच्याद्वारे त्रैकालिक कर्मापासून रहित बनण्याचा प्रयत्न करतो. माझे पूर्वकृत सर्वदोष मिथ्या होवोत. वर्तमानातील सर्व दोषापासून मी रहित बनतो आणि भविष्यकालीन सर्व पापांचा मी त्याग करतो अशा प्रकारे भाव प्रतिक्रमण, भाव आलोचना व भाव प्रत्याख्यान या रूपाने सहजतेने परिणाम करतो. त्यांना मन-वचन-कायेने समर्पित होऊन केवळ आत्मशांतीसाठी प्रयत्नशील बनणारा ज्ञानी गृहस्थ सर्वांचा त्याग करून केवळ एका महाव्रताला धारण करतो. महाव्रताला धारण करणे म्हणजे सर्व प्रकारच्या सावद्ययोगाचा त्याग होय.

**आत्मस्वरूपातील रमणता-**

सर्व पापांचे मूळ कारण असणाऱ्या शरीराचा विकल्प पूर्णपणे सोडून यथाजात आत्मस्वरूपाचा आश्रय घेऊन आत्मस्थ होतो. आपल्या आत्मस्वरूपामध्ये राहणारे श्रमणपणाची सामग्री परिपूर्ण केल्याने ते साधक समदृष्टी बनून साक्षात श्रमण बनतात. समता रूप परिणाम सदैव ठेवतात. साधू महाराज आपल्या परिणामांना अत्यंत सरळ शांत व अध्यात्म रसपूर्ण ठेवतात. मौन राहण्यातच आपले खरे हित समजतात. प्रयोजनवश खूप कमी बोलतात. तरी सुद्धा आपल्या आत्मस्वरूपातच तन्मय राहतात. श्री पूज्यपाद आचार्य इष्टोपदेश या ग्रंथात म्हणतात.

**इच्छत्येकांतसंवासं निर्जनं जनितादरः।**
**निजकार्यवशात् किंचितदुक्त्वा विस्मरति द्रुतम्।।**
**ब्रुवन्नपि हि न ब्रूते गच्छन्नपि न गच्छति।**
**स्थिरीकृतात्मतत्त्वस्तु पश्यन्नपि न पश्यति।।**

साधू महाराज निर्जन स्थळाबाबत अत्यंत आदर बाळगतात. सदैव एकांतवासाची इच्छा करतात. कदाचित स्वतःच्या प्रयोजनासाठी थोडंफार बोलून शीघ्रतेने विसरून जातात. म्हणून ते बोलत असताना देखील बोलत नाहीत. चालत असतानाही चालत नाहीत. पाहत असतानाही पाहत नाहीत. कारण त्यांनी आपल्या आत्मस्वरूपात स्थिरता प्राप्त केलेली असते. वास्तविक आत्मरसिक

आत्मानुभवामध्ये असे लीन होतात की त्यांना आपल्या आत्मभोगाशिवाय अन्य कार्यात रुची नसते.

समता आसनावर आरूढ होतात. समतारूपी वाहनाची सवारी करतात. निरंतर समतारूप परिणामांमध्ये प्रवृत्ती करतात. सर्व जीवांना एकमेव समताच शरण आहे. आम्ही आपल्या घरामध्ये समाजामध्ये आपल्या मित्रमंडळीमध्ये ज्यांचा संपर्क असेल, त्यांना क्षमा करण्याचा स्वभाव ठेवला तर स्वतःलाच शांती मिळते व इतरांनाही शांती मिळते. मुनिराज जीवनभर काय करणार? घरदार सोडून यथाजात रूप धारण करून काय उद्योग करतात? जीवनभर समता परिणामात राहण्यासाठीच उद्यमशील असतात. समता परिणामासाठी अवश्य करण्यायोग्य जे कार्य असते ते आवश्यक म्हणजे मूलगुण होय. साधूंचा एकच महत्त्वाचा गुण आहे. तो म्हणजे समता सामायिक होय. याची अनेक उदाहरणे पदोपदी मिळत असतात.

एकदा एक साधू महाराज एका गावातून चालले होते. काही लोकांनी गर्दी केली आणि त्यांना शिव्या देऊ लागले. थोडा वेळ गप्प बसले. तेव्हा साधू म्हणाले, 'बंधुंनो! तुमचे काम पूर्ण झाले असेल तर मी पुढे जातो.' तेव्हा ते लोक म्हणाले, 'आम्ही तुम्हाला शिव्या देत आहोत हे काय आपल्याला समजले नाही?'

साधू बाबा म्हणाले, 'तुम्ही शिव्या देत आहात ते मला समजले, पण मी शिव्या घेणे बंद केले आहे. तुम्ही दिल्याने काय होणार? त्या मी घेणार नाही. आता मी जागा झालो आहे. जागृत होऊन चुकीची वस्तू कसे काय घेऊ शकतो? जेव्हा मनुष्य बेभान होऊन चालतो तेव्हा पायात काटा घुसतो. जर पाहून चाललो तर काटा कसा घुसेल? पाठीमागच्या गावात काही लोक मिठाई घेऊन आले होते. मी त्यांना म्हणालो, माझे पोट भरले आहे तेव्हा ते आपली मिठाई घेऊन घरी गेले आणि आपापसात वाटून खाऊन आनंदी झाले. आता तुम्ही मला शिव्या दिल्या. मी त्या घेतल्या नाहीत तर त्या शिव्या तुमच्या जवळच राहतील.'

छहढालेत दौलतरामजी मुनिराजांच्या समतेचे वर्णन करतात..

**अरि मित्र महल स्मशान कंचन कांच निंदन थुतिकरण।**
**अर्ध्यावतरण असि प्रहार में सदा समता धरण।।**

**प्रयोग –** यथाख्यात आत्मस्वरूपाच्या प्राप्तीसाठी यथाजात रूपधारी होऊन सहज आत्मस्वरूपाच्या सतत अभेद उपासनेचा पुरुषार्थ करावा.

**(क्रमशः)**


पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......

**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६ ११०
**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील
८७६७५४१७१०


**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

## जिनस्वरा का स्तुत्य उपक्रम

जिनस्वरा संघटन के एक अत्यंत स्तुत्य उपक्रम का परिचय कराते है।

https://jinwani.jinswara.com/ इस वेबसाइट पर ३० से भी अधिक जैन प्रकाशकों का दो हज़ार से भी अधिक ग्रंथस्वरुप साहित्य संकलित किया है। इसमें चारों अनुयोगोंपर किताबें सहज रूप से उपलब्ध है। हमारी युवा पीढ़ी ने आज के इस तकनिकी युग में किताबों को पढ़ने की ये जो सुविधा समाज को दी है, वह अत्यंत प्रशंसनीय है। सभी से अनुरोध है की इस सुविधा का खूब लाभ ले।

**–शिरीष रायबागकर, अहिल्यानगर**

# योगसार चिंतन

(पुष्प १४)

– प्रियदर्शन जैन

**वयतवसंजममूलगुण, मूढ़ह मोक्ख णिवुत्तु।**
**जाम ण जाणइ इक्क, परु सुद्धड भाड पवित्तु।।२९।।**

**जो णिम्मल अप्पा मुणइ, वयसंजमुंसजुत्तु ।**
**तो लहु पावइ सिद्ध, सुहु इउ जिणणाहह वुत्तु।।३०।।**

अर्थ- जो पर्यंत निर्मल भावाचा (परम शुद्ध आत्मभाव) अनुभव होत नाही, तोपर्यंत आपले कल्याण संभव नाही. मिथ्यादृष्टी अज्ञानी जीवाने मोक्षप्राप्तीसाठी केलेले व्रत, तप, संयम हे व्यर्थ असतात।।२९।।

अर्थ- जो व्रत, तप, संयमानी सहित निर्मल आत्म्याचा अनुभव करतो, तो निश्चितच मोक्षास जातो; हे जिनेंद्र वचन आहे ।।३०।।

२९) जो जीव आपल्या देहामध्ये विराजमान आत्मदेवाचा यथार्थ निर्णय करीत नाही, निर्णय करून त्या परम शुद्ध पवित्र भावाचा अनुभव करीत नाही, अंतर्मुख होऊन त्याची श्रद्धा, ज्ञान करून त्यात रममाण होत नाही (चारित्र्य); त्या मिथ्यादृष्टी जीवाने केलेले व्रत, तप, संयम हे निरर्थक असतात.

आचार्यदेव सांगतात,- 'आपल्या भगवत् स्वरूपी आत्मदेवास न जाणता कितीही पूजा-अर्चा केल्या, शास्त्र स्वाध्याय केला, उपवास केले, यात्रा केल्या.... तरी या सर्व क्रिया संवर-निर्जरेला कारण ठरत नाहीत, कारण ज्याच्यासाठी हे सर्व करायचे असते, त्या परम पवित्र आत्मतत्त्वाचे स्वरूप मिथ्यादृष्टी जीव जाणून घेण्याचा प्रयत्नच करीत नाही. तो कांक्षेने सहित असतो व त्यामुळे आपल्या कर्तृत्वबुद्धीचेच पोषण करतो.

याउलट सम्यग्दृष्टी जीव या सर्व क्रिया आपले यथार्थ वीतरागी आत्मस्वरूप जाणून करतो, त्यामुळे कर्तृत्व भावाचे पोषण होत नाही.....सर्व आवश्यक क्रियांचे पालन त्याचेकडून सहजच होते. त्याला आपल्या वीतरागी देव-शास्त्र-गुरूंच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झालेले असते, म्हणून त्याच्या सर्व क्रियाही सम्यक् असतात.

अविरत सम्यदृष्टी जीवाच्या जीवनात आपल्या शुद्ध आत्मभावाच्या साक्षीने शुभ चारित्र्याने अशुभ प्रवृत्तीचा निरोध तर होतोच, सोबतच शुद्ध उपयोगाचे यथार्थ भान झाल्यामुळे शुभ प्रवृत्ती आचरीत असताना सुद्धा तो निरपेक्ष असतो. याच क्रमात पुढे-पुढे पाऊल टाकत तो व्रती बनून मुनी जीवनात प्रवेश करतो. जेव्हा-जेव्हा अंतरंगात म्हणजेच आपल्या आत्मतत्त्वात त्याचा प्रवेश होतो, तेव्हा-तेव्हा शुद्ध भावाचे पारडे जड होऊ लागते आणि त्याने शुभाचाही निरोध होतो. याच समीचीन मार्गावर वाटचाल करीत पुढे शुद्धभावाचे साक्षीने साक्षात् सिद्धशिलेवर विराजमान होतो.'

आचार्यदेव सांगत आहेत.- 'तीर्थंकर होण्यापूर्वी तो जीवदेखील आपल्या समानच होता.. त्यांनी स्वतःमध्येच पुरुषार्थ केला आणि या पदाची प्राप्ती केली... हे भव्य जीवा! तू सुद्धा तसे करू शकतोस! स्वतःला ओळख..या देहाच्या आणि मनाच्याही पलिकडे तू एक चैतन्यमयी आत्मतत्त्व आहेस....त्यात साक्षात् परमात्मा विराजमान आहे.... त्याची ओळख तर तुला याच अवस्थेत, याच भूमिकेत करावी लागेल आणि त्यांचे समान पुरुषार्थही करावा लागेल.... जरी कठीण वाटत असले तरी थांबू नकोस! सिद्धपद प्राप्त करणे हा

जैनदर्शनाने तुला दिलेला जन्मसिद्ध अधिकार आहे....त्याचे ब्रीद वाक्य आहे- 'भक्त नही भगवान बनेंगे!' अन्य कोणतेही दर्शन हा अधिकार प्रदान करीत नाही....ते फक्त भक्त किंवा सेवक बनण्याचा मार्ग दाखवितात!

येथे कित्येकांचे मनात विचार येतील की, 'आमची तर मुनी बनण्याची शक्ती नाही, मग आम्ही धर्मसाधना कशी करायची?' आचार्य समंतभद्रदेव आपल्या रत्नकरंड श्रावकाचार या ग्रंथात सांगतात- 'हे भव्य! तू श्रावकधर्म अंगीकार कर.. अणुव्रते धारण कर.. धर्म धारण करण्याकरिता सर्वप्रथम तुला मिथ्यात्वाचा नाश करावा लागेल....कारण कषाय किंवा राग-द्वेषाचे उत्पत्तीचे कारण अज्ञान म्हणजेच मिथ्यात्व आहे. सम्यक् ज्ञानाच्या द्वारे जर तू वस्तुस्वरूपाला जाणशील, तरच तुझ्या मिथ्या मान्यता नष्ट होतील.... तुला खऱ्या देव-शास्त्र-गुरुंचा निर्णय होईल.... आपल्या निज स्वरूपाचा निर्णय होईल.... मग प्राथमिक अवस्थेत त्यांच्या निमित्ताने तू आपल्या स्वरूपाची अनुभूती करू शकतो आणि हा अनुभवच खऱ्या धर्माची सुरुवात आहे! याच भूमिकेत पुढे एकदेश संयम धारण करून संसार व शरीर भोगांपासून विरक्ती वाढून आत्मस्वरूपात प्रवृत्ती वाढत जाते आणि अप्रत्याख्यानावरण कषाय मंद होऊ लागतात.... याप्रमाणे हा जीव मोक्षपथावर आरूढ होऊन पुढे-पुढे वाटचाल करू लागतो.

३०) जोपर्यंत शुद्ध वीतराग स्वभावाचा म्हणजेच आत्मतत्त्वाचा अनुभव होत नाही, तोपर्यन्त व्रत, तप, संयम, शील हे सर्व मोक्षासाठी कार्यकारी ठरत नाहीत, असे जिनेन्द्रदेवांचे वचन आहे. आत्मभान झाल्यानंतर जीव अल्पकाळात सिद्धपद प्राप्त करतो. सम्यग्दर्शनाशिवाय तो चार गतींमध्ये भ्रमण करीत राहतो. आत्म्याचा जो द्रव्य स्वभाव आहे त्यानुसार परिणमन करणे, हेच खरे मोक्षाचे कारण आहे....मग आत्मानुभवासोबत होणाऱ्या सर्व क्रिया आपोआप सम्यक् स्वरूप धारण करू लागतात, सहजच पाळल्या जातात. असा हा ज्ञानी जीव अल्पकालातच मोक्षाला प्राप्त करतो.

चैतन्यमयी निज आत्मतत्त्वाला जाणल्याशिवाय मोक्षमार्गाची सुरुवातच संभवनीय नाही.... यालाच आगमात सम्यग्दर्शन सुद्धा म्हटले आहे.... या सम्यग्दर्शनरूपी मूळाच्या आधारावरच धर्मरूपी वृक्ष पल्लवित होतो.... याच वृक्षावर पुढे मोक्षरूपी फळ लागते.

अंतरंग परिवर्तनाशिवाय बाह्य परिवर्तन कसे संभव होणार ? आणि जरी होताना दिसले तरी ते मुळीच कार्यकारी नसते! आचार्यदेव येथे हेच सांगत आहेत.-'अंतरंगात निज आत्मतत्त्वाची श्रद्धा आणि अनुभवाच्या सोबत असणारे बाह्य आचरण हे वास्तविक चारित्र्य या संज्ञेस पात्र ठरते. आत्मतत्त्वाची खरी ओळख झाल्यावर या जीवास समजते की, तो फक्त जाणणारा आहे..... करणारा नाही..! या सत्याला जो ओळखतो, त्याचा अहंभाव आणि कर्तृत्वभाव नाहीसा होतो आणि ज्याच्या अहंभावाचे विसर्जन झाले आहे, त्याला या संसारात रस उरत नाही. आणि ज्या जीवामध्ये अकर्तृत्वभावाचे सृजन झाले तो स्वतःला शुभ-अशुभ भावांपासून तथा शरीरापासून पृथक् ज्ञानरूपाने अनुभवू लागतो.... मग अशा जीवाच्या सर्व क्रिया निर्जरेस कारणीभूत ठरतात, म्हणजेच मोक्षाकरिता कार्यकारी ठरतात.

जे जीव भगवंताची पूजा-अर्चा, संसार, शरीर भोगांच्या लालसेने करतात, ते मूढ मिथ्यादृष्टी होत आणि जे जीव याच क्रिया फक्त वीतरागतेच्या पुष्टीसाठी करतात ते सम्यग्दृष्टी होत. त्यांचेकरिता याच क्रिया आत्मकल्याणाकरिता निमित्त बनतात. ते जाणतात की, जिनपूजा-स्वाध्याय-ध्यान इ. क्रिया तर एक माध्यम आहेत, ज्यांचे द्वारा त्यांचा भेदविज्ञानाचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत जाणार असतो.... ज्याच्या शिवाय मोक्षमार्गावर एक पाऊल सुद्धा टाकणं शक्य नसतं.

***** **( क्रमशः )**

# अनंतानुबंधी कषाय : स्वरूप का ऊहापोह

## (भाग ४)

**Discussion on Jainism Whatsapp Group**

**२४. सही दिशा में पुरुषार्थ से आपका क्या मतलब है?**

पुरुषार्थ सुख के प्रयोजन के लिए किया जाता है। जीव के सुख में बाधा डालनेवाले पापों का क्रम निश्चित है - मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय, और योग। हमने कई बार इस क्रम का उल्लंघन करते हुए अविरति, प्रमाद, कषाय और योग को टालने की दिशा में पुरुषार्थ करने का असफल प्रयोग किया है, क्योंकि मिथ्यात्व को हमने नजर अंदाज कर दिया। इसके चलते ना ही हमारा मिथ्यात्व टला और ना ही अविरति, प्रमाद, कषाय, और योग। हमें रंच मात्र भी सच्चा निराकुल सुख हासिल ही नहीं हुआ। हमने कषायों के अनंतानुबंधी स्वरुप को भली भाँती जानकार उसके त्याग का प्रयत्न ही नहीं किया। अक्सर लेश्या के अनुसार होने वाले मंद कषाय रूप परिणामों में ही संतुष्ट हो गए और मानकर चले की हम मोक्षमार्गस्थ है। पुरुषार्थ जब मिथ्यात्व को मिटाने में जुट जाता है तब उसकी दिशा सही मानी जाती है। क्योंकि ऐसे पुरुषार्थ से ही सम्यक्त्व की प्रथम प्राप्ति होती है, जिसमें स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र भी शामिल है। लेकिन हमने स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र प्राप्त किये बिना ही संयमाचरण चारित्र को प्राप्त करने का विपरीत पुरुषार्थ कई बार किया है, जिसके चलते आज भी संसार में ही है, दुःखी ही है।

**२५. द्रव्यलिंगी के बारें में कहते है की कोई उसके देह के तुकडे करें और ऊपर से नमक छिड़के तो भी वो क्षमा धारण करता है। लेकिन आप कह रहे हो की इस परिस्थिति में भी अनंतानुबंधी क्रोध विद्यमान है। कैसे?**

द्रव्यलिंगी मतलब हमारी बातें प्रश्न में बतायी क्षमा तो हमने धारण की, लेकिन वो मंदोत्तम लेश्या रूप परिणाम है। हमने माना की 'मैं' क्षमा धारण करता हुँ। इसके साथ ही गर्भित रूप से ये मान्यता भी आती ही है की 'मैं' क्रोध करता हुँ। कितना क्रोध करता हुँ? अनंत। क्योंकि मान्यता में अनिष्ट बुद्धि एकदम मजबूती से पड़ी है। पड़ी है मतलब श्रद्धा गुण का परिणमन उसरूप चालु ही है। इस मिथ्यात्व के अनंत अनिष्ट परिणमन के चलते मंदोत्तम लेश्या रूप क्षमा में भी तीव्र अनंतानुबंधी क्रोध ही है।

इसका मतलब कतई ये नहीं की हम क्षमा का अवलम्बन न ले। इसका मतलब ये है कि, अनंतानुबंधी क्रोध को मिटाये।

**२६. बाहुबली पर चक्र फेकते समय भी भरत चक्रवर्ती के उत्तम क्षमा विद्यमान है। ये कैसे मुमकिन है?**

भरत चक्रवर्ती क्षायिक सम्यग्दृष्टि थे। उनकी श्रद्धा में इष्टानिष्ट की कल्पना रूपी मिथ्यात्व हमेशा के लिए ख़तम हो चूका था। श्रद्धा गुण की पर्याय में तो यही परिणमन था की मेरे लिए कुछ भी इष्टानिष्ट है ही नहीं (मतलब अनंतपणा ख़तम हो चूका था)। ऐसे सम्यक् श्रद्धा परिणमन के चलते, जिसमें कोई भी अनिष्ट भासित ही नहीं होता, निमित्त रूप से चारित्र में अनंतानुबंधी क्रोध का अभाव सिद्ध होता है। जिसके चलते ये बात बिलकुल स्वीकृत होती है की बाहुबली पर चक्र फेकते समय भी भरत चक्रवर्ती के उत्तम क्षमा विद्यमान है।

**२७. द्रव्यलिंगीपना धारण करते हुए हमारे अत्यंत विनय रूप परिणामों में तीव्र अनंतानुबंधी मान कषाय कैसे विद्यमान थी?**

मैं अत्यंत विनय रूप परिणमता हुँ, ऐसी मान्यता के चलते गर्भित रूप से मेरा मान करना स्वभाव है ऐसी अत्यंत खोटा अभिप्राय बना रहा।

मान्यता में हमने अनंत अनिष्ट बुद्धि को कसके पकड़के रखा। इस अनंत अनिष्ट बुद्धि के निमित्त जो भी अनिष्ट भासे उसे निचा और स्वयं को उचा दिखाने का परिणाम, यानी तीव्र अनंतानुबंधी मान कषाय सदा विद्यमान ही रहा। किसमें विद्यमान रहा? लेश्यारूपी अत्यंत विनयरूपी परिणामों में इसका मतलब कतई ये नहीं की हम विनय का अवलम्बन न ले। इसका मतलब ये है की अनंतानुबंधी मान को मिटाये।

**२८. द्रव्यलिंगीपना धारण करते हुए हमारे अत्यंत सरल परिणामों में तीव्र अनंतानुबंधी माया कषाय कैसे विद्यमान थी?**

यहाँ एक बात विशेष उल्लेखनीय है की, पंडित टोडरमलजी ने मोक्ष मार्ग प्रकाशक में लिखा है की द्रव्यलिंगी (यानी हम खुद)अत्यंत प्रामाणिकता से मोक्षमार्ग की साधना करता है तभी तो वह अंतिम ग्रैवेयक तक जाता है। हमने मान्यता में अनंत पदार्थों के प्रति इष्टत्व की खोटी बुद्धि को छोड़ा ही नहीं। इस अनंत पदार्थों के प्रति इष्टत्व की खोटी बुद्धि के निमित्त रूप से चारित्र गुण की पर्याय में कपट किया (चाहे वो किसी अन्यसे हो या खुद से)। ये कपट हमारे लेश्यानुसार वर्गीकृत अत्यंत सरल परिणामों में ही तीव्र अनंतानुबंधी माया कषाय बनकर बरकरार रहा।

इसका मतलब ये नहीं की मायाचार को अपनाना चाहिए। इसका मतलब है की अनंतानुबंधी माया को मिटाना चाहिए।

**२९. द्रव्यलिंगीपना धारण करते हुए हमारे अत्यंत संतुष्ट परिणामों में तीव्र अनंतानुबंधी लोभ कषाय कैसे विद्यमान थी?**

हमने मान्यता में अनंत पदार्थों के प्रति इष्टत्व की खोटी बुद्धि को छोड़ा ही नहीं। इस अनंत पदार्थों के प्रति इष्टत्व की खोटी बुद्धि से आशा का अनन्तरूपी खड़ा ज्यों का त्यों बना रहा। इसके निमित्त रूप से चारित्र गुण की पर्याय में लोभ किया। ये लोभ हमारे लेश्यानुसार वर्गीकृत अत्यंत संतुष्ट परिणामों में ही तीव्र अनंतानुबंधी लोभ कषाय बनकर बरकरार रहा।

इसका मतलब ये नहीं की लोभ को अपनाना चाहिए। इसका मतलब है की अनंतानुबंधी लोभ को मिटाना चाहिए।

**३०. क्या मिथ्यात्वी जीव अनंतानुबंधी कषाय से बच सकता है?**

बिलकुल बचा जा सकता है। जो सही दिशा में पुरुषार्थ करें वह अनंतानुबंधी कषाय को मंद करता हुआ उसका उपशम करके स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र की प्राप्ति करता है।

**३१. मिथ्यात्वी जीव अनंतानुबंधी कषाय को किस प्रकार मंद कर सकता है?**

अनंतानुबंधी की निमित्त-नैमित्तिक व्यवस्था को अच्छी तरह समजकर अनंत मिथ्या मान्यताओं का त्याग करने में उद्यमशील रहे तो अनंतानुबंधी कषाय मंद हो सकते है। इसके लिए प्रथम कषाय करने के अभिप्राय को त्याग दे। इस बात को अच्छी तरह समझे की अनंतानुबंधी कषाय का सम्बन्ध तीव्र/मंद (लेश्यानुसार वर्गीकृत) से नहीं है, अपितु कषाय करने के अभिप्राय से है। अभिप्राय में विचारपूर्वक और अत्यंत दृढ़तापूर्वक इस निर्णय तक पहुंचे की मैं मात्र परम पारिणामिक भाव स्वरुप हुँ। मैं संसार या मोक्ष रूपी किसी भी कार्य को नहीं करता। इस परम सत्य को स्वीकार करे की कषाय का त्याग सर्वप्रथम उसको करनेके अभिप्राय के त्याग से शुरू होता है। सतत अपने वास्तविक परम पारिणामिक भाव स्वरूप के आलम्बन (परोक्ष रूप से ही सही) से अनंतानुबंधी कषाय मंद हो सकती है। साथ ही में सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र का प्रयत्नपूर्वक अंगीकार करें ऐसा करते हुए भी अपना 'मैं' निरंतर परम्पारिणामिकभाव में ही अत्यंत दृढ़ता से सम्हाल के रखे।

**३२. जिस तरह लेश्यानुसार तीव्र/मंद कषाय समझ में आते है, उसीप्रकार तीव्र/मंद अनंतानुबंधी कषाय समझ में आ सकते है?**

सम्यक्त्व-सन्मुख मिथ्यादृष्टि का वर्णन करते हुए पंडित टोडरमल लिखते है की ऐसे जीव को

अपने भावों की पहचान होती है। उसे स्थूलरूप से और अनुमान से ही सही लेकिन अनंतानुबंधी कषाय की तीव्रता/मंदता ख्याल में आती है। अन्य जीवों को नहीं आती इसलिए वो हमेशा लेश्यानुसार तीव्र/मंद कषाय को जानते हुए उन्ही में उलझे रहते है।

**३३. इस समस्त उहापोह का सार क्या है?**

नीव के बिना मंजिले निर्माण नहीं होती है। स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र के बिना संयमाचरण चारित्र नहीं होता। इसलिए स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र, जिसका स्पष्ट वर्णन आचार्य कुन्दकुन्ददेव रचित चारित्रपाहुड (गाथा ५-८) में मिलता है, उसका बारीकीसे अभ्यास करके उसे अंगीकार करनेका उग्र पुरुषार्थ करे, यही इस समस्त ऊहापोह का सार है।

**३४. हम आजतक स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र को क्यों नहीं अपना सके?**

क्योंकि हमने चारित्र को हमेशा ही शरीरादि क्रिया और लेश्यानुसार वर्गीकृत तीव्र/मंद कषाय की दृष्टि से ही नापा है। इसलिए हमारी बहुत बड़ी समस्या ये है की हमको स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र में कोई चारित्र नजर आता ही नहीं। भरत चक्रवर्ती जब बाहुबली पर चक्र फेक रहे थे तब हमको चक्र फेकनी की क्रिया और लेश्यानुसार वर्गीकृत तीव्र कषाय ही नजर आते है। लेकिन उस वक्त भी उनके चारित्र गुण की पर्याय में शंकादि अतिचार, मल-दोषरहितपना और निःशंकादि गुणों का प्रकटपना ये इतना बड़ा स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र नजर ही नहीं आता। हम उसका अनुमान तक लगाने में हिचकिचाते है। न हमें अनंतानुबंधी कषाय के स्वरूप के बारें में स्पष्टता है और न ही हमको स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र का स्वरूप पता है। इन कमीयों के चलते हम अनेकबार द्रव्यलिंगीपना धारण करते हुए भी स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र को नहीं अपना सके; संयमाचरण चारित्र तो बहुत दूर की बात रही।

**( क्रमशः )**

## जैन हिल्स, जळगाव येथे आयोजित FALI स्पर्धेमध्ये बाहुबली येथील विद्यालयाचा तृतीय क्रमांक



एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली येथील FALI (Future Agriculture Leaders of India) विषयाच्या विद्यार्थ्यांनी जैन हिल्स, जळगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जैन हिल्स येथे इनोव्हेशन मॉडेल स्पर्धा व बिझनेस प्लॅन स्पर्धा अशा दोन प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश या तीन राज्यांतील एकूण ६५ शाळांनी सहभाग नोंदविला होता.

बाहुबली गुरुकुलातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. त्यापैकी प्रणव जाधव, प्रथमेश हुंडेकरी व आदिश निर्वाणे यांनी **'गोमय कोटः'** (गाईच्या शेणापासून रंगनिर्मिती) हा अभिनव बिझनेस प्लॅन सादर केला. या उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर महाविद्यालयाने ६५ शाळांमधून तृतीय क्रमांक मिळवून संस्थेचा गौरव वाढविला. तसेच अभिनंदन पाटील यांनी रोबोट्रॅक (RoboTrac) हे नावीन्यपूर्ण मॉडेल सादर केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकता, सर्जनशीलता व उद्योजकीय दृष्टिकोनाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून परीक्षकांची प्रशंसा मिळवली. याशिवाय राज पाटील याने उत्कृष्ट विद्यार्थी (Best Student) म्हणून या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक तसेच इतर सर्व शिक्षक व FALI विषय शिक्षिका सौ. नयना मोहरेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'सोलहकारण भावना भाय....!'

(लेखांक १५)

**हर्षा वेखंडे, नागपूर,**९८२२६९०८६०

## ❋ प्रवचन भक्ती भावना (भाग २)

जयपूरमधील अनेक भव्य जिनालयांमधील मनोज्ञ प्रतिमांचे भावपूर्वक दर्शन घेत घेत सायंकाळी संवेग, सक्षम व शारदाआजी आता पोहोचल्या होत्या, 'दिगंबर जैन पंचायत बडा मंदिराच्या' प्रवेशद्वारात !

प्रांगणात पाऊल टाकताना आजी म्हणाल्या, 'मुलांनो, बरेच प्राचीन मंदिर आहे बरं का हे, १७५७ च्या सुमारास बांधलेलं!'
मुलांची नजर संपूर्ण परिसरात भिरभिरली.

सक्षमची चौकस बुद्धी जागृत झाली... तो म्हणाला, 'आजी, हे या कोपऱ्यातलं बांधकाम तेव्हापासून आत्तापर्यंत सुरूच आहे; असं वाटतंय्, कारण बघा ना.... ते अपूर्ण आहे !'

आजी उत्तरल्या, –'बाळांनो! या मंदिराचे निर्माण करणाऱ्या श्रेष्ठींनी मुद्दाम हे काम अपूर्ण ठेवलं आहे, जेणेकरून कोणालाच असा गर्व व्हायला नको की या मंदिराचं निर्माण मी केलं आहे! अशा पवित्र भावनेने बनवलं आहे बरं का हे मंदिर!!'

मुलांच्या चेहऱ्यावरचं अप्रूप आजींच्या नजरेने टिपलं. अत्यंत भक्तीभावाने मंदिरात प्रवेश केला... अरहंत भगवंतांच्या स्तुती–वंदनेनंतर मंडळी वळली स्वाध्याय कक्षाकडे....

'संवेग! हे आहे सरस्वती शास्त्र भांडार. जिनवाणीची प्रसन्नता जणू इथे दरवळते आहे.. वर्तमानात विश्वातील सर्वाधिक प्राचीन शाईने लिहिलेला सचित्र ग्रंथ श्री आदिपुराण शास्त्र येथे विद्यमान आहे बरं! त्यात जे रंग वापरले गेले आहेत ते त्या त्या रंगाचे रत्न घासून तयार केले आहेत. आता तुम्ही सचित्र श्री भक्तामर स्तोत्राचं पुस्तक बघितलं आहे....श्री भक्तामर स्तोत्राला सचित्र रूप देण्याचं काम सर्वप्रथम येथेच झालं आणि ती पहिली सचित्र भक्तामराची प्रत आजही येथे आहे. मुलांनो, श्री समयसार हा अध्यात्मातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ. या ग्रंथाची संस्कृत टीका मूळ ग्रंथ लेखनाच्या १००० वर्षांनंतर अमृतचंद्र आचार्यांनी लिहिली आणि त्याचा अनुवाद ढुंढारी भाषेत पंडित जयचंदजी छाबडा यांनी केला. नंतर त्याचे हिंदी, मराठी आदि भाषांमध्ये अनुवाद अन्य विद्वानांनी केले. पंडित जयचंदजी छाबडा यांचं हस्तलिखित भाषावचनिका येथे जतन केले आहे बरं का! श्री रत्नकरंड श्रावकाचार या ग्रंथाची टीका पंडित सदासुखदासजी यांनी लिहिली आहे, त्याचेही हस्तलिखित येथे उपलब्ध आहे. असे हजारो दुर्लभ आणि प्राचीन ग्रंथ येथे उपलब्ध आहेत....

आणि मुलांनो, आता मी फार महत्त्वाची गोष्ट सांगते तुम्हाला....आचार्यकल्प पंडित टोडरमलजींचं नाव माहिती आहे ना तुम्हाला?'

'हो, हो आजी त्यांचं जीवनचरित्र माहिती आहे आम्हाला..' संवेग ताबडतोब म्हणाला.
'आणि मोक्षमार्ग प्रकाशक हा ग्रंथही... आणि नवव्या अधिकारातला तो शेवटचा शब्दही..' सक्षमने वाक्य पूर्ण केलं.

थोडी शांतता पसरली. सर्वांचं अंतःकरण अभिमानाने उचंबळून आल्यागत झालं. टोडरमलजींचं अभूतपूर्व व्यक्तित्व आणि कर्तृत्व डोळ्यांपुढे उभं राहिलं...

आजींच्या शब्दांने शांतता तुटली. त्या म्हणाल्या, 'हीच ती जागा, जिथे पंडित तोडरमलजी स्वाध्याय, लेखन, वाचन करायचे. येथेच मोक्षमार्ग प्रकाशक हा ग्रंथ लिहिला गेला. ते स्वाध्याय करत असलेले ९९ ग्रंथ येथे या शास्त्र भांडारात ठेवलेले

आहेत. हे पवित्र स्थान पंडितप्रवर टोडरमलजींचं कार्यस्थळ राहिलं आहे.... बघा किती पवित्र आहे ही जागा!'

'आजी, टोडरमलजींचं महात्म्य माहिती आहे आम्हाला. आज आपण जिथे उभे आहोत, तिथेच ते काही वर्षांपूर्वी वावरत असतील, शास्त्र लेखन करत असतील, प्रवचन करत असतील.... या विचारानेदेखील माझ्या अंगावर रोमांच उभे राहत आहेत!' संवेग भारावून म्हणाला.

'मुलांनो, भगवान महावीरानंतर एकेक कडी बनून अनेक भव्य जीवांनी आमच्यापर्यंत हे अनमोल प्रवचन पोहोचवले. त्या पुरुषार्थी जीवांची फार श्रेष्ठ परंपरा राहिली आहे. भगवान महावीरांच्या शासन काळात आपण आहोत. त्यांच्यापासून आपल्यापर्यंत ही अनमोल संपदा कशी पोहोचली? ते बघू या..

महावीरांनी वयाच्या तिसाव्या वर्षी दीक्षा घेतली. बारा वर्षे सहा महिने घोर तप केल्यानंतर त्यांना वयाच्या ४२व्या वर्षी केवलज्ञानाची प्राप्ती झाली. भव्य जीवांच्या कल्याणार्थ दिव्य देशना दुमदुमली. त्यानंतर अथक तीस वर्षे भगवंतांच्या वाणीचा लाभ जनमानसाला मिळाला. चौथ्या काळाचे तीन वर्षे, आठ महिने व पंधरा दिवस बाकी होते, तेव्हा वर्धमान स्वामींचं निर्वाण झालं. ज्या दिवशी सकाळी महावीर भगवंतांचं निर्वाण झालं, त्याच दिवशी संध्याकाळी गौतमस्वामींना केवलज्ञान झालं. गौतमस्वामी, सुधर्माचार्य, जंबूस्वामी हे तीन अनुबद्ध केवलज्ञानी महावीर भगवंतानंतर झाले. त्यानंतर कोणाला केवलज्ञान तर झालं नाही, पण क्रमाने विष्णू, नंदीमित्र, अपराजित, गोवर्धन,भद्रबाहू हे पाच मुनिराज द्वादशांगाचे धारी श्रुतकेवली झाले. त्यांना भगवंताच्या केवलज्ञानाचं संपूर्ण ज्ञान होतं. त्यांचा काळ क्रमाने १०० वर्षांचा राहिला. त्यांच्या पाठी विशाखाचार्य, प्रोष्ठिलाचार्य, क्षत्रिय, जयसेन, नागसेन, सिद्धार्थ, धृतिषेण, विजय, बुद्धिमान, गंगदेव, धर्मसेन हे ११ परम दिगंबर मुनिराज दहा पूर्वांचे धारी होते, त्यांचा एकूण कार्य काळ १८३ वर्षे राहिला. त्यांनीही भगवंताच्या वाणीची यथावत् प्ररुपणा केली. त्यांच्यानंतर नक्षत्र, जयपाल, पांडूनाम, ध्रुवसेन, कंसाचार्य हे पाच महामुनी हे ११ अंगाचे ज्ञानी होते. त्यांचा काळ २२० वर्षे राहिला. त्यांच्यानंतर सुभद्र, यशोभद्र, महायश, लोहाचार्य हे पाच मुनी एका अंगाचे ज्ञानी होते. ते ११८ वर्षात झाले.

अशाप्रकारे भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर ६८३ वर्षापर्यंत प्रवचनाची धारा सहजतेने प्रवाहित होत राहिली. त्यानंतर मात्र पंचम काळाच्या निमित्ताने जीवांची बुद्धी-शक्ती यांची मंदता होत गेली. असं असूनही आचार्य कुंदकुंद आदि अनेक मुनिराज अंगांच्या अंशाचे ज्ञानी होते.

कुंदकुंदांचे शिष्य होते उमास्वामी! त्यांनी तत्त्वार्थसूत्राची रचना केली. उमास्वामींनी लिहिलेले तत्त्वार्थसूत्र उपलब्ध आहे. तत्त्वार्थसूत्रावर पूज्यपाद स्वामींनी सर्वार्थसिद्धी नावाची टीका लिहिली तर तत्त्वार्थसूत्रावर आ. अकलंक देवांनी १६,००० श्लोकांची राजवार्तिक ही टीका लिहिली तर आचार्य विद्यानंदीस्वामींनी २०,००० श्लोकांमध्ये श्लोकवार्तिक ही टीका लिहिली. समंतभद्र स्वामी यांनी ८४ हजार श्लोकांमध्ये गंधहस्ति-महाभाष्य नावाची मोठी टीका लिहिली, जी आज उपलब्ध नाही. गंधहस्ति-महाभाष्य या टीकेच्या मंगलाचरणावर समंतभद्र स्वामींनी ११५ श्लोकांमध्ये देवागमस्तोत्र रचलं, ज्याला आप्तमीमांसा असेही म्हणतात..'

'एका तत्त्वार्थसूत्र या ग्रंथावर लिहिलेलं केवढं मोठं साहित्य हे....!' संवेगने आश्चर्याने तोंडात बोट घातलं.

'हो तर... हे तर फक्त तत्त्वार्थसूत्र ग्रंथाशी संबंधित बरं का! भगवंतांचे संपूर्ण प्रवचन चार भागांमध्ये विभाजित केलं जातं.

प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग. करणानुयोगाचे गोम्मट्टसार, लब्धिसार, क्षपणासार, त्रिलोकसार आदि अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत.

चरणानुयोगाचे मूलाचार, आचारसार, रत्नकरंड श्रावकाचार, भगवती आराधना, स्वामी कार्तिकेयानुप्रेक्षा, आत्मानुशासन, पद्मनंदी पंचविंशतिका, पुरुषार्थसिद्‌ध्युपाय, ज्ञानार्णव असे विविध ग्रंथ आहेत.

प्रथमानुयोगामध्ये जिनसेनाचार्य लिखित आदिपुराण, गुणभद्र आचार्य लिखित उत्तरपुराण असे चरित्र ग्रंथ उपलब्ध आहेत.

कुंदकुंदाचार्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यातील ८४ पाहुड प्रसिद्ध आहेत. दिगंबर जैन परंपरेतील ते महान तत्त्वज्ञ, आध्यात्मिक मार्गदर्शक आणि गूढ तत्त्वज्ञानाचे सखोल विवेचन करणारे आचार्य होते. त्यांनी रचलेले ग्रंथ आजही आत्मज्ञान, मोक्षमार्ग आणि द्रव्य-गुण-पर्याय यांच्या सूक्ष्म तत्त्वांचा अभ्यास करण्यासाठी मूलभूत मानले जातात. त्यांच्या लेखनात आध्यात्मिक अनुभव, तत्त्वज्ञानाची परिपक्वता आणि साधकासाठी स्पष्ट मार्गदर्शन दिसते.

कुंदकुंद आचार्यांनी प्राकृत भाषेत अनेक अमूल्य ग्रंथांची निर्मिती केली. त्यापैकी प्रमुख ग्रंथ म्हणजे समयसार, प्रवचनसार, पंचास्तिकाय, नियमसार आणि अष्टपाहुड होत. या ग्रंथांना पंचपरमागम म्हणतात.

समयसार हा ग्रंथ आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाचं अत्यंत गूढ पण तर्कशुद्ध विवेचन करतो. आत्मा हा ज्ञानमय, चेतन आणि शाश्वत आहे, हे या ग्रंथाचं मुख्य प्रतिपादन आहे.

प्रवचनसारमध्ये आत्म्याच्या ज्ञान तत्त्वाचं त्याचप्रमाणे ज्ञेयरूपाने आत्म्याच्या स्वरूपाचं वर्णन केलं आहे. आत्मा जाणणारा आहे, ज्ञानस्वरूपी आहे आणि ज्याला जाणायचं आहे, ते ज्ञेयही तोच आहे. ज्ञान तत्त्व आणि ज्ञेय तत्त्व रूपाने आत्म्याचं वर्णन करणारं हे शास्त्र आहे. त्यानंतर चरणानुयोग चूलिकेत सम्यक्चारित्ररूपाने मुनी चारित्राचं वर्णन आहे. एकूणच सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र्य या तीन रत्नांची ओळख करून देणारं हे शास्त्र आहे.

पंचास्तिकाय या ग्रंथात जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म आणि आकाश या पाच अस्तिकाय द्रव्यांचं वर्णन केलं आहे. त्याचप्रमाणे मोक्षमार्गाचंही वर्णन आहे.

नियमसारमध्ये संयम, नियम आणि आत्मानुशासन यांचे महत्त्व सांगून साधकाला चारित्र्याच्या आंतरिक शुद्धीकडे नेण्याचा प्रयत्न केला आहे. अष्टपाहुड हा आठ प्राभृतांचा संग्रह आहे.

कुंदकुंद आचार्यांच्या ग्रंथांची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे, त्यांची आध्यात्मिक गहनता आणि तत्त्वज्ञानाची स्पष्टता. त्यांनी व्यवहार नय (व्यवहारिक दृष्टिकोन) आणि निश्चय नय (परम तत्त्वदृष्टी) यांचा सुंदर समन्वय करून जीवाला आपल्या खऱ्या स्वरूपाची जाणीव करून दिली आहे.

निष्कर्षतः कुंदकुंद आचार्यांनी लिहिलेले ग्रंथ जैन तत्त्वज्ञानाचे अमूल्य रत्न आहेत! त्यांनी आत्मज्ञानाचा प्रकाश सर्व साधकांपर्यंत पोहोचवून मोक्षमार्ग अधिक स्पष्ट आणि सुलभ केला आहे. आजही त्यांच्या ग्रंथांचे अध्ययन केल्यास जीवाला आपल्या शुद्ध स्वरूपाची अनुभूती होऊन आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग खुला होतो. त्यामुळे जैन धर्माच्या अभ्यासात आणि आध्यात्मिक साधनेत कुंदकुंद आचार्यांचे स्थान सदैव सर्वोच्च राहील.

या अनमोल साहित्यातील जे ग्रंथ आम्हाला उपलब्ध असतील त्या ग्रंथांचं अत्यंत भक्तिभावाने वाचन करणं, ऐकणं, त्यावर चिंतन-मनन करणं, ज्यांना समजून घेण्याची इच्छा आहे त्यांना समजावून सांगणं हे  सारे परिणाम म्हणजे प्रवचन भक्ती होय.'

'आजी, चार अनुयोगांमधील कुठल्या ग्रंथांचा स्वाध्याय प्रथम करावा, याचा काही नियम आहे का?' संवेगने विचारले.

'मुलांनो, प्रथम प्रथमानुयोगाचा स्वाध्याय करावा आणि नंतर इतर अनुयोगांचा स्वाध्याय करावा असा काही नियम नाही.. 'मोक्षमार्ग

प्रकाशक' या श्रेष्ठ ग्रंथात आचार्यकल्प टोडरमलजी म्हणतात, 'आपल्या परिणामांची अवस्था बघून ज्या अभ्यासामुळे आपली धर्मात प्रवृत्ती होईल, त्या ग्रंथांचा स्वाध्याय करावा.' प्रयोजनभूत तत्त्व समजावून सांगणारे शास्त्र सर्वप्रथम समजून घ्यावे. सरणाऱ्या आयुष्याचा काय भरोसा! 'कशासाठी पोटासाठी!' हा मंत्र जपत सरणाऱ्या आयुष्यात वास्तवात शास्त्राभ्यासात जो दिवस लागतो तो धन्य आहे. आगमाच्या अभ्यासाशिवाय जो वेळ जातो तो निरर्थक आहे! स्वाध्यायाशिवाय धर्मध्यान होत नाही, पापांपासून सुटका होत नाही, कषायांची मंदता होत नाही, शास्त्राभ्यासाशिवाय संसार, शरीर आणि भोगांपासून विरक्ती येत नाही. ही विरक्ती नसेल तर जीव सतत दुःखी राहतो.

या उलट शास्त्राभ्यासपूर्वक होणाऱ्या सम्यग्ज्ञानाने जीवाला सुखाचा रस्ता उघडतो. स्वाध्याय हे उत्कृष्ट धन आहे, परम मित्र आहेग शास्त्र अभ्यासू जीवाचा जगामध्येही आदर-सत्कार होतो.

मुलांनो, म्हणून शास्त्राचा स्वाध्याय नियमाने करावा... हे तर आपल्या आत्म्याला दिलं जाणारं ज्ञानदान आहे! आपल्या कुटुंबियांना-स्नेहीजनांना हा सुखाचा रस्ता आवर्जून दाखवावा, कारण ज्ञानदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.'

'आजी, आम्हाला शाळेचा अभ्यास पण असतो.... क्लासेस-ट्यूशन यातून फारसा वेळ मिळत नाही आम्हाला....' इति सक्षम.

'मुलांनो! शास्त्राचा एक शब्द, काही वाक्यं, एखादा श्लोक आम्हाला विचार करण्यासाठी बाध्य करतो, सन्मार्गाकडे अर्थात् मोक्षमार्गाकडे वळण्यासाठी निमित्त ठरू शकतो. याच पद्धतीने शास्त्र अभ्यासात रुची उत्पन्न होते...आणि तुम्हाला माहितीये ना,

**'रुचि अनुसारी वीर्य..!'** मोक्षाचा पुरुषार्थ तो जीव करतोच करतो.

एकूण जीवाच्या अनंत सुखाचं अर्थात मोक्षाचं कारण ठरते प्रवचनभक्ती. ही प्रवचनभक्ती जीवाला अपार कल्याणकारी आहे, हे समजून घेऊन भगवंतांची वचनं अर्थात शास्त्र समजून घेण्याकडे वळावं आणि शक्तीनुसार आचरणातही उतरवावं.'

आजींचे शब्द मुलांच्या मनापर्यंत पोहोचत होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव आजींच्या स्वाध्यायी हृदयाला समाधान देत होते. या अबोल स्निग्ध शांततेत सर्वांनी शास्त्रवंदनेसाठी हात जोडले.

**हे जिनवाणी भारती, तोहि जपो दिनरैन ।**
**जो तेरी शरणा गहै, सो पावै सुख चैन ।।**

**(क्रमशः)**

---


**भारतीय सहली,**
**परदेशी सहली,**
**तीर्थयात्रा,**
**हनिमून टूर्स,**
**विमान व रेल्वे तिकीट,**
**पासपोर्ट, विसा**

# गोमटेश टूर्स अँड ट्रॅव्हल्स

**गोमटेश कॉम्प्लेक्स, मेन रोड, कुपवाड**

*** नवीन वर्षातील आयोजित टूर्स**
*** संपूर्ण देश-विदेशातील सहली आयोजित करणारी विश्वासू कंपनी**
*** भन्नाट धमाल, अविस्मरणीय क्षण-अनुभव गोमटेश टूर्सच्या माध्यमातून पूर्णपणे सुरक्षित.. परवडणारा दर आणि आपुलकीची सेवा ..!!**

**** सम्मेद शिखरजी, गुजरात, राजस्थान, नेपाळ, काश्मीर, आसाम, श्री सिस्टर्स, अंदमान, केरळ, मध्यप्रदेश, त्रिस्थळी या सर्व यात्रेचे बुकिंग सुरू आहे.***

टीप : रेल्वे व विमानसाठी ट्रीपच्या तारखेच्या तीन महिने अगोदर बुकिंग करणे आवश्यक आहे.

**संपर्क क्रमांक - १) श्री. श्रेणिक चौगुले ९०९६६०३५१० २) श्री. रोहित चौगुले ९८३४६९१३६६**
**३) श्री. पारिसा मुळे ८२०८८ ७२८२७ ४) ऑफिस क्रमांक ७८ २० ९९२२०९**

# पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ

(लेखांक – ३०)

**विपुल खेडकर,** नागपूर

सगळ्या व्यापांतून निवृत्त होऊन बाहेर पडण्यासाठी प्रयत्नरत असतांनाही जबाबदाऱ्या अंगावर येऊन पडतातच.... कितीही नकोसे वाटले तरी स्वीकार करून आदर्शत्वाचा पाठ सर्वांपुढे ठेवावाच लागतो....अशा पट्टमहादेवी सर्वांमध्ये राहूनही स्वतःला वेगळं कसं करतात ते वाचू या आता या भागात.....!

**काय कुणाचे देणे घेणे, आम्ही सदैव कर्तव्याला सामोरे!**

सन्निधानांचा आदेश प्राप्त झाला त्याप्रमाणे राणी लक्ष्मीदेवी, राजकुमार नरसिंह आणि धर्मदर्शी तिरुवरंगदास राजधानीत येऊन पोहोचले. राणींचे मन शंकाकुशंकांनी ग्रस्त होते तर, पट्टमहादेवींनी निःशंक मनाने दोघांचेही स्वागत मोठ्या समारंभाने केले. राणी लक्ष्मीदेवींना विश्वासच बसत नव्हता! त्यांचे महाल देखील सजविलेले होते... प्रवासाचा शीण जाईल अशी आरामदायी व्यवस्था बघून राणींचा जीव सुखावला.

पट्टमहादेवींनी दुसऱ्या दिवशी राणींशी बोलून तिकडचा समाचार जाणून घेतला. गुप्तहेर आणि मायण द्वारा प्राप्त माहिती, तुळुकाडूमधील अधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती, पकडलेल्या कैद्यांकडून मिळालेली माहिती एकत्र झाली. आता राणी लक्ष्मीदेवी आणि राजपुत्र नरसिंह यांच्या हत्येच्या षड्यंत्राच्या बातमीचा निकाल लावण्याची वेळ येऊन ठेपली होती. सोबतच पट्टमहादेवींच्या हत्येच्या षड्यंत्राची अफवा देखील होतीच! त्याचेदेखील पुरावे–माहिती, या सगळ्यांचा सूत्रधार कोण.... याचीसुद्धा शहानिशा होणार होती. सन्निधानांच्या अनुपस्थितीत पट्टमहादेवींनी न्यायपीठावर आसीन व्हावे, अशी प्रधानमंत्री गंगमय्यांनी विनंती केली. परंतु पट्टमहादेवींनी त्यांनाच मुख्य न्यायाधीश म्हणून काम करण्यास सुचविले. कारण त्या स्वतः या प्रकरणात नकळत ओढल्या गेल्या होत्या.

तुळुकाडू राज्याचे मुख्य अधिकारी हुलमय्या, मुख्य गुप्तहेर मायण आणि प्रधानमंत्री गंगमय्या न्यायपीठावर विराजमान होते. पट्टमहादेवी, राणी लक्ष्मीदेवी, राजपुत्र विनयादित्य दुसऱ्या बाजूला उच्चासनावर विराजमान होते. समोरच धर्मदर्शी, राणी लक्ष्मीदेवींचे वडील बसले होते. पकडून आणलेल्या व्यक्तींच्या प्रश्नोत्तरांच्या तपासण्या, उलटतपासण्या सुरू होत्या. तपासणीचा सूर राणी लक्ष्मीदेवीची दासी मुद्दलापाशी येऊन थांबला. तिला न्यायपीठासमोर आणण्याचे आदेश दिले गेले. यावेळी ती राणींसोबत राजधानीत आली नव्हती, तिला तुळुकाडूतच थांबविले होते. त्यामुळे ती न्यायासनासमोर येईपर्यंत आठ दिवसांकरिता न्यायपीठ स्थागित ठेवण्यात आले.

मधल्या काळात महाराज बिट्टीदेवांनी जयकेशीवर मोठ्या पराक्रमाने विजय मिळिवला. बरेच दिवस रेंगाळलेल्या या युद्धात तरुण दंडनायक बिट्टियण्णा यांनी दाखविलेल्या कल्पकतेने आणि शौर्याने, तसेच राणी बम्मलदेवींनी केलेल्या धाडसी कामगिरीने विजयलक्ष्मी खेचून आणली होती. परंतु शत्रूच्या पुढच्या हालचालींचा अंदाज येत नव्हता, त्यामुळे सध्या तरी युद्धक्षेत्री तळ ठोकून बसणे; या व्यतिरिक्त हालचालींवर मर्यादा आल्या होत्या. अशातच पट्टमहादेवींकडून सन्निधानांना पत्र प्राप्त झाले...' न्यायदानाच्या या गुंतागुंतीच्या, विशेषतः राजपरिवाराच्या दोन्ही महत्त्वाच्या व्यक्ती गुंतलेल्या

असतांना; सर्वसंबंधित मंडळी तणावात असतांना.... चक्रव्यूहाचा भेद करू शकणारी एकमेव ताकद म्हणजेच सन्निधानांनी जातीने स्वतः येऊन हे प्रकरण हाताळावे'– अशी पट्टमहादेवींची विनंतीवजा आज्ञा बघून दोनच दिवसांत महाराज राजधानीत दाखल झाले. पर्णहीन वृक्षांना पावसाचा एक शिरवा देखील नवसंजीवनी देतो, तशी राजधानीत पसरलेली मरगळ सन्निधानांच्या आगमनाने दूर झाली! कामे तीच पण ऊर्जासहित व्हायला लागली.

न्यायसभा दासी मुद्दलेच्या विषयावर येऊन थांबल्याने राणी लक्ष्मीदेवींपेक्षा त्यांचे वडिल तिरुवरंगदास यांच्या तोंडचे पाणी पळाले होते.... राणी लक्ष्मींशी एकांतात बोलणे आवश्यक होते ..... सन्निधानांचे आगमन अचानक झाल्याने गोष्टी आणखीच अवघड झाल्या होत्या....!

**विखुरलेल्या वाटा**

अशातच दुसऱ्या दिवशी पहाटे युवा शिल्पकार डंकण, ज्याने मूर्तीतील सदोषत्व केवळ दगड परीक्षणाने ओळखले होते, आपल्या गावी क्रीडापुरला मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवास राजदम्पतीने यावे हे आमंत्रण घेऊन आला. वचनबद्ध असलेले महाराज विचार करून म्हणाले, 'दोनच दिवसांत महोत्सव आहे... अजून चार दिवस येथे विशेष काम नाही, तेव्हा आम्ही पट्टमहादेवींना घेऊन उद्या निघतो.' त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी पहाटेच दोघांचेही क्रीडापुरकडे प्रस्थान झाले.

त्यांची पाठ फिरण्याचाच अवकाश,राणी लक्ष्मीदेवींनी प्रधान गंगराजांना निरोप दिला, 'मी वेलापुरीत कुमार नरसिंहाकरिता नवस बोलला होता, त्यासाठी मला जायचे आहे. तेव्हा जाण्याची व्यवस्था करा.'

गंगराज स्वतः उपस्थित झाले. ते राणींना म्हणाले, ' अशा प्रसंगी सन्निधान सोबत राहतील तर चांगले होईल. ते वापस आल्यानंतर तुम्ही त्यांच्यासोबतच जाणे उचित ठरेल.'

मनातल्या मनात चडफडत राणी म्हणाल्या,

'आपला सल्ला योग्यच आहे ...परंतु नवस मी बोलले आहे, तेव्हा त्याची पूर्ती मलाच करायला हवी...मी माझ्या वडिलांना विचारले आहे की, मी नवस बोलले तर मी एकटीच पूर्ण करू शकते ना ? त्यांनी संमती दिली आहे. शिवाय पंचमीला सन्निधान प्रतिष्ठेचे धर्मकार्य तिकडे करणार...त्याचवेळी मी इकडे करणार.. एका अर्थाने पूजा पूर्ण होणार...! तेव्हा निःशंक मनाने व्यवस्था करावी!!'

'जशी आपली आज्ञा! आपल्यासोबत बाकी राणीपरिवार येणार आहे का?'

'त्या कां येतील ?'

'त्या स्वतः येणार नाहीत, परंतु त्यांना येण्यासाठी विचारणे लौकिक उपचार असतो ना म्हणून.....'

' हा विषय काही राजमहालाशी संबंधित नाही... त्यामुळे अशा उपचारांची आवश्यकता नाही. शिवाय क्रीडापुर प्रतिष्ठा महोत्सवासाठी फक्त दोघेच गेलेत ना? बाकी कुणाला विचारले कां?'

' ठीक ! राणीजी तेथे किती दिवस राहणार ?'

' जास्त राहून काय करणार? तीनचार दिवस पर्याप्त आहेत.'

' बरे, आपणास काय काय साहित्य हवे....'

' वडिलांना विचारून सांगते..'

' जशी आज्ञा ! येतो आम्ही!'

प्रधान गंगराज निघून जाताच वडिलांना बोलावणे धाडले. खोट्या नवसाच्या सामानाची यादी तयार झाली! आपली मुलगी येथल्या रीती ओळखून आपले मनोभाव पूर्ण करण्याचा प्रयत्न करते आहे हे बघून पिताश्री खूष झाले! दुसऱ्याच दिवशी तिघे बेलापुरीला निघाले.

राजकुमार विनयादित्य ही बातमी ऐकून म्हणालेच, 'नवसाच्या बहाण्याने दोघांना काही गुफ्तगू करायची असेल... कदाचित नव्या षड्यंत्राची सुरुवात.... यांच्यावर नजर ठेवायलाच हवी!'

प्रतिष्ठा समारंभ सानंद उत्साहात पार पडला. तेथे शिवगंगेचे धर्मदर्शी आले होते. हेच ते शिवगंगा,

जेथे चार पर्वत चार वेगवेगळ्या आकाराचे प्रतीत होतात. येथील पहाड म्हणजे जणू नैसर्गिक शिल्पच! याच जागी राजदम्पतीचा एकमेकांशी परिचय दृढ झाल्याच्या रम्य आठवणी निगडित होत्या. धर्मदर्शींनी दोघांनाही शिवरात्री महोत्सवाचे आमंत्रण दिले.

बेलापुरीहून नवस पूर्ण करून लक्ष्मीदेवी व अन्य आदल्याच दिवशी दाखल झाले होते. दुसऱ्या दिवशी राजदम्पती क्रीडापूरहून आले. वेलापुरीला नवस फेडण्यासाठी गेल्याची बातमी ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. पण 'आनंदाची गोष्ट आहे!' एवढे बोलून या विषयावर चर्चा करणे महादेवींनी टाळले.

न्याय्य बाजू समोर यावी या उद्देशाने षड्यंत्राशी संबंधित काही लोक राजधानीत आणले गेले होते. त्यामुळे पुन्हा एकदा मुख्य न्यायाधीश सन्निधान यांच्या निर्देशनात कामकाज सुरु झाले, मात्र ज्या दासीच्या साक्षीकरिता न्यायदान थांबले होते तिची याच मधल्या काळात हत्या झाली.... परत स्थिती जैसे थे !

**वाढती नाराजी**

सन्निधानांसोबत विजयोत्सवासाठी आलेले छोटे बिट्टीदेव आणि विनयादित्य, दोघे भाऊ एकान्तात भेटले. विनयादित्यांनी या संदर्भातील आपले अनुभव आणि धर्मदर्शींवर असणारा संशय सांगितला. सोबतच आपल्या मातुश्रींसोबत वेळोवेळी घडलेले संवाद सांगितले आणि शेवटी ते म्हणाले, 'मला सुरुवातीपासूनच छोट्या राणींकडून काही ना काही नकोसे घडेल असे वाटायचे.... पण मला लहान समजून माझ्या विचारांची कोणी कदर केली नाही...परंतु आता मला स्पष्टपणे वाटत आहे की, विचारपूर्वक आपण काही मार्ग काढायला हवा.'

'जे मातुश्रींना पसंत नाही असे कोणतेच काम आपण करू नये.'

' बरोबर आहे आपले म्हणणे.... परंतु आपल्या भवितव्याचा देखील विचार व्हायला हवा ना? आपल्या उदार धोरणाने उद्या छोट्या राणींच्या हट्टाने कुमार नरसिंहाचा राज्याभिषेक केला गेला तर, आपण काय त्यांच्या अधीन राहायचे ?'

' आपल्या तिघांमधे एकता राहिली तर ते काय करू शकणार ? आपण मोठ्या अप्पाजींसोबत बोलू.'

' हो नक्कीच!'

' चोकिमय्या, राज्याचे मोठे सैन्याधिकारी, ते सुद्धा विजयोत्सवाकरिता आले आहेत, त्यांच्याशी सुद्धा बोलावे लागेल....'

' ते काय करतील ?'

' वाईट वेळ सांगून येत नसते...ही तयारी आवश्यक असते....'

' परंतु मातुश्रींना जरादेखील सुगावा लागला तर....'

' काळजी करू नका.... चोकिमय्यांसोबत माझे संबंध घनिष्ठ मित्रत्वाचे आहेत... ते माझ्यावर आपले प्राण फुंकायला देखील कमी करीत नाहीत!'

'असे असेल तर ठीकच ! विजयोत्सवाच्या समाप्तीपर्यंत आम्हाला काही ना काही ठोस निर्णय घ्यावाच लागेल...'

दोन दिवसांनी परत एकदा न्यायासन बसले. अराजकता, खोट्या बातम्या पसरविण्यात कारणीभूत दोघांना आजीवन कारावास, चार जणांना देशोधडीला पाठवणे, एकाला सहा वर्षांचा कारावास तर चार लोकांची मुक्तता असा न्याय करण्यात आला. तसेच मुद्दला दासीच्या हत्याऱ्यांना शोधण्याचे कार्य लवकरात लवकर करण्याचे संबंधितांना सांगण्यात आले.

मर्यादित लोकांमधे न्यायसभा चालली... न्यायदानाचे काम झाले... तरी सर्वसामान्य लोकांमधे चर्चा सुरुच होत्या,–

' पट्टमहादेवींसारखी राणी शोधून सापडणार नाही. जराही गर्व नाही, उच्च – नीच भाव नाही, सगळ्यांशी प्रेमपूर्वक, आदराने वागणे बोलणे....'

' त्यांच्यासारख्या इतर राण्या असत्या तर.....'

' त्यांच्यासारख्या? त्यांच्या बाजूला बसलेली छोटी राणी बघून तर मस्तकात तिडीक उठते.... सिंहासनावर जणू उंदीर...! ना राणीपदाला साजेसे वागणे ... ना बोलणे....!!'

‘ सतत मान वाकड्यात... आणि बोलणे कुचक्यात...!’

‘ मी तर असे ऐकले की, विजयोत्सवानंतर मोठे धार्मिक आंदोलन चालवून सगळे राज्य वैष्णव करण्याची तयारी सुरु आहे ....’

‘ छोट्या राणीच्या या दुर्बुद्धीपूर्ण कार्याचा दण्ड त्यांना मिळायलाच हवा...! अनाथ म्हणून जिथून आलेली तिथेच पाठवून द्यायला हवे !’

‘ आवेशात येऊन काहीही बोला... पट्टमहादेवींमध्ये सगळ्यांना ठीक करण्याची क्षमता आहे.. नीच शत्रूला देखील त्या आपले बनवून योग्य मार्गावर आणतात...’

‘ कधी कधी असे वाटते की, त्या आवश्यकतेपेक्षा जास्त क्षमाशील आहेत! आता तर मला असेही समजले आहे की, त्यांनी सगळ्यातून निवृत्त व्हायचे ठरवले आहे....’

‘एवढे मात्र त्यांनी करू नये. सन्निधान सदैव रणांगणात...आणि इकडे छोट्या राणी....बापरे.... आपले कसे होईल.... कल्पनाच करवत नाही...!’

**नवे पर्व, नवे धोरण**

विजयोत्सवाचा दिवस येवून ठेपला. परंपरेनुसार मंगल स्नान, अनुष्ठान, देवदर्शन आदीने सुरुवात होऊन दुपारला सार्वजनिक सभेसाठी सारे जमले होते. धर्मगुरु, मंत्री, प्रांत अधिकारी, राजपरिवार, जनता सर्वजण आपआपल्या व्यवस्थेनुसार स्थानापन्न होते. सभेला संबोधित करतांना युद्धातील अनेक प्रसंग, वीरांचा सन्मान, शौर्य अनेक गोष्टींचा उल्लेख करून महाराजांनी याचप्रसंगी ज्येष्ठ चिरंजीव कुमार बल्लाल यांचा युवराज्याभिषेक सोहळा संपन्न करण्याची घोषणा केली. तसेच मधले चिरंजीव - छोटे बिट्टीदेव राज्याच्या पूर्वभागात आमचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत राहतील. धाकटे राजकुमार विनयादित्य राजधानीत राहून राज्यकारभारात मदत करतील, आम्ही स्वतः उत्तर भागात राज्याच्या विस्तार आणि समृद्धतेसाठी प्रयत्नरत राहू, तर धाकटे राजकुमार नरसिंह सध्या आपल्या मातुश्री आणि दण्डनायकांच्या देखरेखीत प्रशिक्षण घेतील, असे त्यांनी जाहीर केले.

दोन-तीन दिवस विजयोत्सव, युवराज्याभिषेक सोहळे आटोपून मंडळी गावोगावी परतली. महाराजही प्रस्थान करणार होतेच तर पट्टमहादेवींनी संपूर्ण राजपरिवारासोबत श्रवणबेळगोळची यात्रा करण्याची इच्छा दर्शविली. सर्वांनीच मोठ्या उत्साहाने स्वागत केले. या निमित्ताने आलेल्या राजपरिवारातील मोठ्या तीन राण्या, सन्निधान आणि सर्व राणी परिवार, युवराज-युवराज्ञी, सर्व राजपुत्र, अशी सर्व तयारी झाली, मुहूर्तही निश्चित झाला. निघण्याची वेळ येऊन ठेपल्यावर छोट्या राणींनी येणार नाही म्हणून सांगितले. समजावयाला गेलेल्यांना दूषित वाक्बाणांनी घायाळ केले आणि राजधानीतच मुक्काम केला.

यात्रा संपन्न करून ठरल्याप्रमाणे सर्व आपआपल्या कार्यक्षेत्राकडे निघाले. राणी पद्मलदेवी सहित तिघींना घेऊन पट्टमहादेवींनी पूर्ण राज्यातील त्यांच्या इच्छित स्थळांना भेटी देण्याचे ठरविले. आवश्यक तेवढा फौजफाटा घेऊन त्या शिवगंगा येथे आल्या. एक सप्ताह तेथे राहून क्रीडापूरला आल्या. तेथे काही दिवस राहून कुडली क्षेत्री, अगदी लहान असतांना राजधानीला जातांना आल्या होत्या, जेथे शारदादेवीची उभी मूर्ती आहे; त्या जागी आल्या. तेव्हाची ती गोष्ट.... शारदामाता सर्वत्र बैठक रूपात तर लक्ष्मीमाता उभ्या रूपात असतात, येथे अपवाद कां? याची तेथील धर्मदर्शींनी सांगितलेली गोष्ट त्यांनी इतर राण्यांना कथन केली. तुंगभद्रेच्या काठी काही काळ विश्रांती घेतली, चिंतन केले. पुढे आपले जन्मगाव बलिपुरला आल्या. आपल्या या माहेरच्या अनेक आठवणी ऐकवल्या.. आठवल्या... जणू बालपण पुन्हा एकदा अनुभवले! पुढे यादवपुरीला लेक-जावयांची भेट घेतली. त्यांना काही गोष्टी सांगितल्या, काही जुन्या आठवणींत रमल्या. बलिपुर करून हानुंगलला दोन महिने

सन्निधानांसोबत व्यतीत केले. वारंवार त्या सन्निधानांना राज्यविस्तारापासून परावृत्त करण्याचा, आपण स्वतः आक्रमण न करण्याचा, विचार ऐकवीत होत्या. एखाद्या धर्मक्षेत्री शांतपणे काही दिवस राहण्याचा विचार बोलून दाखवीत होत्या. सन्निधान मात्र त्यांना स्वतःची स्फूर्तिदेवता संबोधून, आपण आम्हास तलवारबाजीमधे हरविले होते याची आठवण देऊन, त्यांच्यातल्या क्षात्रवृत्तीला जागविण्याचा प्रयत्न करीत होते. पट्टमहादेवींच्या मनातील भाव ते ओळखू शकले नाहीत. यात्रा बरीच लांबली...सन्निधानांना आपण त्यांच्या निश्चयापासून दूर करू शकणार नाही हे जाणवून, अधिकच अलिप्तपणाने मधल्या राजपुत्रांकडे जाण्याचे टाळून महादेवी राजधानीत पोहोचल्या. आपल्या माघारी युवराजांनी– युवराज्ञींनी घडी नीट बसवलेली बघून आनंदल्या आणि समाधान पावल्या.

काय होते पट्टमहादेवींच्या मनात ? कशाची तयारी त्या करीत होत्या ? कशाचे चिंतन सुरू होते? वाचू या पुढील भागात !

(क्रमशः)

## एआय, डिजिटल साधने व अध्यापन पद्धतींवर बाहुबली येथे शिक्षक कार्यशाळा संपन्न

श्री बाहुबली विद्यापीठाच्या शाखांतर्गत अध्यापक–अध्यापिका यांची मार्गदर्शन कार्यशाळा शुक्रवार दि. १२ व शनिवार दि. १३ जून २०२६ रोजी शांतिसागर प्रवचन हॉल येथे उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात परमपूज्य समंतभद्र महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. स्वागत व प्रास्ताविक समन्वय समितीचे सचिव श्री. ऋषभनाथ मलिकवाडे यांनी केले. त्यांनी सर्व शिक्षकांना बाहुबली विद्यापीठाची प्रतिज्ञा दिली. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी अल्फोन्सा हायस्कूल, मिरजच्या सौ. उत्कर्षा मोटे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व डिजिटल साधनांचा शैक्षणिक वापर या विषयावर मार्गदर्शन केले. चॅटजीपीटी, जेमिनी, नोटबुक एलएम आदी आधुनिक साधनांचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले व तेही प्रात्यक्षिकासहित दाखविले. शिक्षणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अवश्य करावा, पण सावधानता देखील गरजेची आहे.

दुसऱ्या दिवशी श्री. अविनाश कुलकर्णी यांनी २१व्या शतकातील कौशल्ये, नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांसमोरील आव्हाने यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. राजेश बनकर यांनी 'शिकणं सोपं करूया' या विषयातून विद्यार्थीच्या मनावरील संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ श्री. संदीप वाकचौरे यांनी शिक्षकांची कार्यक्षमता, सकारात्मक दृष्टिकोन व ज्ञानसमृद्धी याविषयी मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात श्री. युवराज पाटील यांनी 'आनंदाचा पासवर्ड' या विषयातून विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी नाते जोडून अध्यापन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब पाटील, महामंत्री श्री. डी. सी. पाटील, श्री. प्रकाश पाटील व श्री. अशोक पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रकाश मगदूम व सूरज पाटील यांनी कार्यशाळेचा अनुभव सांगितला. संचालक श्री. गोमटेश बेडगे यांनी कार्यशाळेत मांडलेल्या संकल्पनांचा शैक्षणिक कार्यात प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. या कार्यशाळेसाठी शालेय समन्वय समितीचे सचिव ऋषभनाथ मलिकवाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहसचिव सुरेश चौगुले यांनी सर्वांचे आभार मानून सर्व अध्यापकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शाखेतील सर्व मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, अध्यापक–अध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण २२५हून अधिक लोक उपस्थिती होते.

एकंदरीत प्रभावीपणे कार्यशाळा संपन्न झाली. याचा सर्वांना निश्चितच लाभ झाला.

( छायाचित्रे पृष्ठ क्र. ४३वर)

# वाचू आनंदे, लिहू नेटके!

पुस्तक समीक्षण...




पुस्तकाचे नाव–

## रतन टाटा – एक दीपस्तंभ

प्रकाशन साल–२०२१, लेखक–शंतनू नायडू,
अनुवाद– डॉ. शुचिता नांदापूरकर–फडके (२०२२)

आपल्या या छोट्याशा आयुष्यामध्ये आपण नानाविध लोकांना भेटतो, मात्र त्यातील काहीजण आपल्याला आयुष्य जगण्याचा, हे आयुष्य सुंदर असण्याचा आणि सोबतच ते अधिक अर्थपूर्ण करण्याचा मार्ग दाखवून आपली अमिट छाप निर्माण करतात. असेच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे संपूर्ण जगभर नावाजलेले भारतरत्न श्री. रतनजी टाटा! आजवर आपण खूप पुस्तके हाताळली असतील ह्या सहृदयी दात्याविषयीची.... मात्र फक्त एक यशस्वी उद्योजक म्हणून! आपल्या लेखकाने वैयक्तिक आयुष्यातील हळुवार, कोमल, खंबीर टाटा सर आपल्याला या पुस्तकातून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

**भेटीची पार्श्वभूमी–**

ह्या कथेची सुरुवात होते लेखक शंतनू नायडू ह्यांचे कुत्र्यांवर असलेले प्रेम आणि त्यातून उदयाला आलेल्या Motopaws ह्या उपक्रमापासून! मोटोपॉज एक सामाजिक उपक्रम आहे, ज्यात भटक्या कुत्र्यांसाठी रात्रीच्या अंधारात reflect होणारे कॉलर्स तयार केले जातात. त्यामुळे रात्रीच्या वेळी कुत्र्यांसोबत रस्त्यांवर होणारे अपघात टाळले जाऊ शकतात. आपल्या ह्या उपक्रमाबद्दल लेखकाने रतनजी टाटांना कळवावे, म्हणून टाटा कंपनीमध्येच काम करणारे त्यांचे वडिल (ज्यांना ते 'नायना' म्हणतात) त्यांना प्रोत्साहित करतात आणि लेखकाच्या आयुष्यात सुरू होतो एक रोमांचकारी आणि अद्भुत असा प्रवास...!

**मैत्रीचा प्रवास–**

हृदयीचेच कनवाळू , कुत्र्यांप्रति आत्मीयता असलेले टाटा सर लेखकाला त्यांच्या मुंबईच्या ऑफिसमध्ये बोलवतात. त्या भेटीच्या आधी लेखकाच्या मनात आलेल्या मिश्र भावना लेखक आपल्यापर्यंत उत्कृष्टरीत्या पोहोचवतो.... आणि वाटून जाते– अरे, आपणही काहीसे असेच react झालो असतो. हाच दुवा लेखक आणि आपल्याला जोडून ठेवतो शेवटपर्यंत...!

जसा एखादा कुशल कारागीर हिरा बघताच त्याचे मोल जाणतो, तसेच टाटा सरांनीही आपल्या लेखकाला पारखले असावे. पहिल्या दिवशीच्या ऑफिसमधल्या भेटीनंतर लगेचच टाटा सर लेखकाला घरी येण्याचे आमंत्रण देतात. जेव्हा लेखकाचे वडिल त्यांना न्यायला येतात, तेव्हा टाटा सर म्हणतात, 'काळजी करू नका, सर! तुमच्या मुलाकडे मी लक्ष देईन!!'

त्या भेटीनंतर, लेखक परदेशी शिक्षण घेण्यासाठी पात्र ठरविणाऱ्या G-Mat या परीक्षेच्या तयारीला सुरुवात करतो. पहिल्या प्रयत्नात अपयश येऊनही लेखक लगेच पंधरा दिवसांत दुसरा प्रयत्न करतो आणि उत्तीर्ण देखील होतो. ह्या पंधरा दिवसांचे वर्णन लेखक करतो.–'ख्रिसमस आला आणि गेला.... वर्षाचा शेवटचा दिवस आला आणि गेला....मी कुठेच पाहिलं नाही....अभ्यास करतानाच मी माझ्या मनाला शिस्त लावण्याचा प्रयत्न करत होतो.'

लेखी परीक्षेला पात्र ठरलेला, टाटा सरांचे शिफारस पत्र असलेला लेखक 'हार्वर्डने' नाकारलेला ठरतो. त्याची ही अस्वस्थता समजून घेण्यासाठी परिवार तर होताच....मात्र अजून एक व्यक्ती होती– 'टाटा सर!'

लेखकाने आपला दुसरा Preference दिला होता 'कॉर्नेल बिझनेस स्कूलला'. तिथे त्यांना प्रवेश

मिळाल्यानंतर त्यांचे हे यश आणि आनंद द्विगुणित करण्यासाठी परिवारासोबतच अजून एक व्यक्ती होती– 'टाटा सर!!'

या लेखनातून आपल्या समोर यायला लागते विश्वासाचे, समजुतदारीचे, एकमेकांना समजून घेताना वयाचे बंधन न लागणारे एक सुंदरसे नाते.... म्हटले तर मैत्रीचे, म्हटले तर जिव्हाळ्याचे...!

**मी काय घेतले ?** (My Takeaways)

लेखकाने उद्धृत केलेले रतन टाटांचे काही शब्द मनात घर करून राहतात, जसे– १)दिलेला शब्द पाळणे.

२)काय बोलावं हे मला समजत नाही, तरीही प्रयत्न करून पाहतो.

३)मी नेहमीच इथे असेन, मित्रा!

म्हणूनच जेव्हा लेखक परदेशी जायला निघतो, तेव्हा तो लिहितो, 'दीपस्तंभापासून दूर जायचं नसतं, त्या दिशेने जायचं असतं.' (लेखकाने सुद्धा शिक्षण घेऊन भारतात परत येण्याचे ठरलेले होते.)

**लेखकाचे विचार–**

मला अनुभव पकडायला आवडतात. त्याहीपेक्षा ते इतरांबरोबर वाटायला मला फार आवडतात. जेव्हा मला काहीतरी सुंदर दिसतं, जाणवतं; तेव्हा माझ्याबरोबरच इतरांनीसुद्धा तो अनुभव घ्यावा, असे अगदी मनापासून वाटते.

**समारोप–**

म्हणूनच आपल्यासमोर उद्योग जगतातील या मेरुमणीची कौटुंबिक आणि लोभस अशी दुसरी बाजू उभी राहते.

लेखक व टाटा सरांचा हा प्रवास एक प्रेरणादायी कथा आहे. अत्युच्च यश, प्रतिष्ठा, पैसा मिळवूनही, साधे रहाणीमान ठेवून प्राणिमात्रांवर निःस्वार्थ प्रेम कसे करावे, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

हे पुस्तक वाचून झाल्यानंतरही टाटा सरांचे शब्द, भावना आपल्या मनात घर करून राहतात.

मार्गदर्शक म्हणून लाभलेले टाटा सर सकारात्मकता तर देतातच, पण डोळ्यात पाणीही आणतात.

संवेदनशील मनाला अजूनच समृद्ध करणारे हे पुस्तक प्रत्येकाने एकदा तरी वाचावे, असे आहे.

**– ओजस्वी खंडारे, पुणे**

B.E., M.A.(Educational Technology)

---

**भद्र - भारती**

**✲ इमारती किंवा पैसा म्हणजे संस्था नव्हे; त्यातील नि:स्वार्थी कार्यकर्ते म्हणजे खरी संस्था होय. त्यांच्या बळावरच ती टिकून राहते व वाढते.**

**✲ 'जिनधर्म दक्षिणेत टिकून राहणार' ही आचार्यांची वाणी आहे; परंतु त्यासाठी चिकाटीचे प्रयत्न व्हायला नकोत काय ?**

**- परम पूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज**

## विनम्र निवेदन


**१) भद्रायण –** गुरुदेव समंतभद्र महाराज यांचे मुलांसाठी व संक्षिप्त रुचीवाल्या श्रावकांसाठी १८८ पानांचे पुस्तक आता अनुपलब्ध आहे. एका वर्षात याच्या सर्व प्रती संपल्या आहेत. अत्यंत उपयुक्त व रोचक असे हे पुस्तक आहे. त्याची दुसरी आवृत्ती छापली जात आहे.

**२) गुरुकुल पूजापाठ –** हे पूजनाचे पुस्तक खास करून गुरुकुलातील मुलांसाठी नित्य पूजन करता यावे यासाठी छापले जात आहे. दोन वर्षापूर्वी १००० प्रती छापल्या होत्या. आता याची ही दुसरी आवृत्ती छापली जात आहे. **या पुस्तकांना दानराशी देऊन सहकार्य करावे.**

**संपर्क :** श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, मोबा. नं. ९०४९४ ७३४३४

: लेखक :
डॉ. आलोक जैन
९३७३७१८००३

पुस्तकीय समीक्षा




# आचार्य पूज्यपाद कृत सर्वार्थसिद्धि का समीक्षात्मक अध्ययन

समीक्षक : **अनिल जैन, शास्त्री**
असिस्टेंट प्रोफ़ेसर,जैन दर्शन विभाग
श्री दिगम्बर जैन आचार्य संस्कृत महाविद्यालय,सांगानेर, जयपुर (राजस्थान )

**लेखक-परिचय** : डॉ. आलोक जैन, जैनागम के एक अध्येता विद्वान् हैं। आप शास्त्री की उपाधि के उपरान्त जैनदर्शनाचार्य की परीक्षा उत्तीर्ण कर अध्यापन के क्षेत्र में शासकीय सेवा-कार्य में संलग्न हुए। सेवानिवृत्ति के उपरान्त जहाँ अन्य सामान्य जन आरामदायी जीवन व्यतीत करते हैं; उसके स्थान पर आपने विद्यावारिधि (पीएच.डी.) हेतु एकलव्य विश्वविद्यालय में अपना नामांकन कराया जो कि अन्य जनों को भी प्रेरणास्पद है।

**पुस्तक परिचय-**

प्रस्तुत पुस्तक एक शोध पुस्तक है, जो कि छह खंडों में विभाजित है।

**प्रथम अध्याय : आचार्य पूज्यपाद : व्यक्तित्व एवं कृतित्व-**

जैनाचार्यों का परिचय प्राप्त करना अत्यन्त श्रमसाध्य कार्य है; क्योंकि उनका परिचय उनके स्वयं के द्वारा कहीं भी लिखित नहीं होता है। उनका परिचय शिलालेखों अथवा अन्य साधनों (ग्रंथादिक) से ज्ञात किया जाता है। आपने विभिन्न ग्रंथों के अध्ययन के उपरांत उनका परिचय जन-समुदाय के सम्मुख प्रस्तुत किया तथा उनके कृतित्व का परिचय भी इसमें समाहित किया है।

**द्वितीय अध्याय : सर्वार्थसिद्धि टीका का विशिष्ट परिचय :-**

इस अध्याय में आपने सर्वार्थसिद्धि ग्रंथ के दसों अध्यायों में आए हुए पारिभाषिक शब्दों को संस्कृत भाषा की परिभाषा सहित हिन्दी में स्पष्ट किया है। साथ ही ग्रंथ की मौलिक विशेषताएँ, भाषिक मौलिकताएँ, दृष्टांत शैली आदि को आपने इस अध्याय में स्पष्ट किया है।

**तृतीय अध्याय : सर्वार्थसिद्धि का दर्शन शास्त्रीय अध्ययन -**

सर्वार्थसिद्धि ग्रन्थ करणानुयोग की प्रधानता के साथ न्यायशास्त्र के विषयों को अपने में समाहित किए हुए है। इस अध्याय में आपने जैनागम सम्मत प्रमाण का स्वरूप तथा उसके भेद प्रत्यक्ष और परोक्ष की सोदाहरण समझाया है। इसके अतिरिक्त इस अध्याय में आपने नय-मीमांसा, तत्त्व-मीमांसा, गुणस्थान-मीमांसा और लोक-निरुपण के माध्यम से नय, तत्त्व और गुणस्थान आदि को स्पष्ट किया है।

**चतुर्थ अध्याय : सर्वार्थसिद्धि का समीक्षात्मक एवं तुलनात्मक अध्ययन -**

इस अध्याय में सर्वार्थसिद्धि ग्रन्थ में समाहित विभिन्न विषयों की तुलना षट्खण्डागम, हरिवंशपुराण, पद्मपुराण, भावसंग्रह, पार्श्वचरित उपासकाध्ययन और शान्तिनाथपुराण आदि ग्रंथों से की गई है। यह तुलना लेखक के अत्यन्त श्रमसाध्य कार्य को सिद्ध करती है।

**पंचम अध्याय : सर्वार्थसिद्धि में प्रतिपादित आचारमीमांसा -**

जैन आचार मीमांसा- श्रावकाचार और श्रमणाचार के रूप में दो भागों में विभाजित है। इस अध्याय में श्रावकाचार की मुख्यता से अणुव्रत, गुणव्रत और शिक्षाव्रतों का वर्णन किया गया है तथा श्रमणाचार की मुख्यता से तीन गुप्तियों, पाँच समितियों, दश धर्मो, बारह तपों और चार ध्यानों का वर्णन किया गया है।

**षष्ठ अध्याय : उपसंहार और निष्कर्ष -**

इस अध्याय में सम्पूर्ण ग्रंथ की विषय–वस्तु को निष्कर्ष के रूप में प्रस्तुत किया गया है।

मुझे यह पुस्तक कैसी लगी – करणानुयोग में रुचि होने के कारण तथा उसमें भी सर्वार्थसिद्धि ग्रंथ विशेष रुचिकर होने के कारण मुझे यह पुस्तक अत्यन्त रोचक लगी। मैंने इस पूरी पुस्तक का अध्ययन किया। यह पुस्तक करणानुयोग और न्याय के सभी पहलुओं को स्पर्श करने वाली है और जिनागम की सारभूत पुस्तक है। सर्वार्थसिद्धि की तुलना विभिन्न ग्रंथों के साथ करना भी श्रमसाध्य कार्य है। साथ ही प्रत्येक अध्यायगत पारिभाषिक शब्दों को एक–ही अध्याय में लिखना भी महत्त्वपूर्ण कार्य है।

उपर्युक्त बिंदुओं के आधार से मुझे यह पुस्तक पूर्ण रूप से उपयुक्त लगी।

**विश्लेषण–**

**लेखक का दृष्टिकोण :** शोधग्रन्थ होने के कारण लेखक ने इसमें दार्शनिक चिन्तन को प्रस्तुत किया है। ✻ इसमें जैन न्याय का भी वर्णन किया गया है। ✻ विभिन्न आगमिक परिभाषाओं को स्पष्ट किया है।

**भाषा–शैली–** ✻ सरल एवं सहज भाषा है। ✻ आवश्यकतानुसार संस्कृत की परिभाषाओं एवं श्लोकों को हिंदी में प्रस्तुत किया गया है। ✻ विश्लेषणात्मक शैली का प्रयोग किया गया है। ✻ इस पुस्तक का अध्ययन करना रूचिकर है।

**यह पुस्तक किसे पढ़ना चाहिए–**

✻ जो सर्वार्थसिद्धिकी विषय–वस्तु को सरल एवं रोचक शैली में अध्ययन करना चाहते हों। ✻ जो आचार्य पूज्यपाद के कृतित्व का अध्ययन करना चाहते हों। ✻ जिन्हे जैन न्याय को संक्षेप व सरल रूप से एक स्थान पर देखना हो। ✻ जिन्हें करणानुयोग के विभिन्न विषय जैसे–लोक, गुणस्थान आदि का अध्ययन करना हो।

अंत में ; यह पुस्तक पाठक को जिनागम का सार समझने में अत्यन्त उपयोगी है, एवं सरल और रोचक शैली में निबद्ध है, इसलिए एक बार सबको अवश्य इसका अध्ययन करना चाहिए।

**प्राप्ति स्थल :** १) प्रकाशन एवं संत विभाग, एकलव्य विश्वविद्यालय, दमोह, २) श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, जैन गुरुकुल, कारंजा लाड, ३) आचार्य कुन्दकुन्द जैन संस्कृति सेन्टर, पोन्नूर मलै, वंदावासी

## मागील अंकाविषयी अभिप्राय....

पंडित नेमिनाथजी यांनी सन्मती मासिकासाठी प्रचंड मेहनत घेतलेली आहे आणि ही मेहनत त्यांनी अखंड २५ वर्षे घेतली आहे. ती मेहनत घेत असताना गुरुकुलची जबाबदारी, शाळेची जबाबदारी, तसेच स्वतःच्या संसाराची जबाबदारी सुद्धा त्यांनी अगदी आनंदाने पार पाडल्या आहेत. इतकी वर्षे सकारात्मक चिंतन करत राहणे व त्याला लेखणीमध्ये आणणे हे नक्कीच कठीण आहे, परंतु त्यांनी अगदी आनंदाने पूर्ण केले आहे. त्यांच्या मध्ये जी प्रगल्भता आहे, ती त्यांना सन्मती मासिकाची पुढील २५ वर्षे असेच कार्य करण्यासाठी प्रेरित करत राहो व त्यांच्याकडून अशीच जिनवाणीची प्रभावना वर्षानुवर्षे होत राहो .... प्रिय मित्र नेमिनाथजी! आम्ही सर्व मित्र तुमच्या या कामाला सलाम करतो... सहस्रशः अभिनंदन आणि अनंत अनुमोदना.... **–श्री. शांतिनाथ पाटील (शास्त्री), पुणे**

*****

सुश्री प्रज्ञाताई डोणगावकर, सप्रेम जय जिनेन्द्र..!!

सन्मतीमधील (जून २०२६) आपला **डॉ. नेमिनाथजी शास्त्री : रौप्यमहोत्सवी संपादकीय कारकीर्द** हा लेख म्हणजे शास्त्रीजींच्या व्यासंगाचा गुणग्रहवृत्तीने घेतलेला सुंदर आढावा आहे.

डॉ. नेमिनाथजींनी शिक्षक म्हणून योगदान दिले आहे, देत आहेत. एवढ्याशा व्यापाने थकणारे आमच्यासारखे जेव्हा त्यांचे स्वतंत्र लेखन, तसेच संकलन, संपादन आणि अनुवादन यांची व्याप्ती पाहतो तेव्हा खूप खूप कौतुक वाटते त्यांचे. त्यांच्या संपादनपटुत्वाचा मीही एक लाभार्थी आहे. आपण शास्त्रीजीवर लिहिलेला गौरव लेख प्रोत्साहनाचा पाठ आहे. आपणास मनःपूर्वक धन्यवाद..

आपला धर्मबंधू **श्री. बाळासाहेब शेटे, सांगली**

# डॉ. ए. एन उपाध्ये पुरस्काराचे मानकरी
# श्री. धनंजय श्रीपाल शहा : साहित्यकार्याचा परिचय

**सन्मती शहा, पुणे**

मन आनंदानंच नाही तर समाधानानं, त्यातील तृप्तीनं, गौरवानं आणि गर्वानं भरून आलं. अलीकडं असे प्रसंग फार कमी येतात; पण हा एक असा प्रसंग आला. जैन साहित्य परिषद, कोल्हापूर यांचेतर्फे डॉ. ए. एन उपाध्ये जेष्ठ साहित्यिक पुरस्कार श्री. धनंजय श्रीपाल शहा यांना दि. १ मे २०२६ रोजी कोल्हापूरच्या दिगंबर जैन बोडींगमध्ये एका छोट्या, पण देखण्या कार्यक्रमात दिला गेला. यामुळे आम्हा सर्व भाऊ-बहीण आणि सर्व परिवाराला अपार आनंद झाला. अर्थात् यामागचे कार्य-कर्तृत्व आमचे जेष्ठ बंधू धनंजय भाईंचेच. यापूर्वी याच जैन साहित्य परिषदेने २०२४च्या जैन साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी निवड करून सन्मानित केले होते.

'तीर्थंकर'कार श्री. श्रेणिक अन्नदाते यांनी समकालीन जैन कथा चळवळ सुरु केली, २/३ कथा संग्रह प्रकाशित झाले होते. एकदा मला म्हणाले होते, 'या चळवळीतून नवे लेखक-लेखिका मिळत आहेत, मिळत राहतीलही. पण खरी उपलब्धी म्हणजे या चळवळीतून धनंजय शहा यांच्या रुपानं एक अभ्यासू, साक्षेपी समीक्षक लाभला.' स्त्री कथा लेखिकांच्या कथांचा संग्रह 'शासन'चे संपादकीय वाचावे तेव्हा याचा प्रत्यय प्रकर्षानं येतो. या संग्रहातील बहुशः प्रत्येक कथेचा संदर्भ देत-घेत त्यातील बलस्थाने सांगितली, तसेच उणीवाही दाखवून दिल्या आहेत.

श्री ब्रह्म महतिसागर यांचे 'अभंग व स्फुटकाव्य' याचे संपादन दहिगावच्या संत कवी श्री ब्रह्म महतिसागर जैन साहित्य संशोधन व प्रकाशन केंद्राच्या वतीने श्री. धनंजय शहा यांनी केले. संपादन कामाचा हा अजोड नमुना आहे. श्री ब्रह्म महतिसागरांच्या अभंग व काव्याचे विषयानुसार विभाग, जसे -आरत्या, जिनस्तुती, स्त्री गीते, स्फुटलेखन अशाप्रकारे केले आहे. या अभंग /पदांचा सोप्या भाषेत अर्थ सांगितला आहेच; पण वैशिट्य म्हणजे प्रत्येक विभागाच्या प्रस्तावनारूप त्यातील पदांचे, रचनांचे वेगळेपण, वैशिष्ट्ये सांगत समालोचन केले आहे. सवई, तोटक हे हिंदीतील छंद महतिसागरांनी मराठीत आणल्याचेही दाखवून दिले. या कामी त्यांच्यातील संपादक, समीक्षक आणि संशोधक दिसून येतो. डॉ. ल. रा. नसीराबादकर (माजी मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.) यांनी या पुस्तकासंबंधी अभ्यासपूर्ण अभिप्राय दिला आहे; त्यात ते म्हणतात, 'श्री ब्रह्म महतिसागरांच्या बहुविध स्वरूपाच्या रचनांचा परिचय आणि परामर्श श्री. शहा यांनी अभ्यासपूर्णतेने घेतला आहे. त्यांच्या अभ्यासक आणि उपासक या दोन्ही भूमिकांचा समतोल आढळतो. श्रद्धेला चिकित्सेची जोड आहे. अभ्यास विषयाबद्दल आस्था, सत्यनिष्ठा आणि प्रतिपादनातील आवेशरहितता हा संशोधकाचा धर्म सुयोग्यरीतीने पाळला आहे. महतिसागरांच्या काव्याचे आकलन, आस्वादन आणि मूल्यमापन अशा साक्षेपी भूमिकेतून प्रा. धनंजय शहा यांनी केलेले हे संपादन वैशिष्ट्यपूर्ण आहे. जैन परंपरेच्या आणि मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने ही महत्त्वाची व स्वागतार्ह घटना मानतो. या साक्षेपी संपादनासाठी प्रा. धनंजय यांचे मनःपूर्वक अभिनंदन. प्रा. नसीराबादकर सरांच्या अभिप्रायानंतर आपण पामराने काय बोलावे? थोडक्यात, या संपादन कामात काव्य आस्वाद, समीक्षा आणि संशोधन अशी तिहेरी वीण दिसून आली; ज्याची जाणकारांनी नोंद केली, गौरव केला.

पं. कैलाशचंद्रजी जैन यांनी पं. टोडरमल जी यांच्या 'मोक्षमार्ग प्रकाशक'ची लघुआवृत्तीरूप 'समीचीन धर्म'चे लेखन केले. या पुस्तकाचे मराठी भाषांतर श्री. धनंजय यांनी केले व ते जीवराज ग्रंथमाला सोलापूर यांचेतर्फे प्रकाशित झाले.

श्री. धनंजय शहा यांच्या आजपर्यंतच्या साहित्य भांडारातील 'प. पू. गुरुदेव १०८ समंतभद्र महाराज : समग्र जीवनचरित्र' व 'राघवपाण्डवीय अपरनाम द्विसंधानमहाकाव्य' याचा अनुवाद या दोन कृती म्हणजे जणू 'मानाची पानं' आहेत.

विषापहारस्तोत्रचे रचयिता कवी धनंजय यांचे हे द्विसंधान महाकाव्य आहे. प्रा. महावीर कंडारकर यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावनेत संधानकाव्याविषयी माहिती दिली आहे, या महाकाव्याचे अंतरंगही उलगडून दाखवले आहे. संस्कृत भाषा प्रौढ आणि प्रगल्भ आहे. 'एक शब्द अनेक अर्थ' ही या भाषेची विशेषता आहे. या गुणाधारे कवींनी द्विसंधान, त्रिसंधान, चतुःसंधान ... सप्तसंधानपर्यंत रचना केल्या आहेत. प्रस्तुत द्विसंधान काव्यात रामायण आणि कौरव-पाण्डव कथा अशा दोन महाकाव्यांचा कौशल्याने सुंदर गोफ गुंफला आहे. या काव्याची श्री नेमिचंद्रकृत 'पदकौमुदी' टीकेसह असलेली हस्तलिखित पोथी एक स्नेही आप्त यांचेमार्फत धनंजय शहा यांच्या हाती आली; आणि त्यांच्याच पाठपुराव्याने मराठी अनुवादाची जबाबदारी स्वीकारली. 'धनंजय कवीच्या प्रौढ आणि अलंकारिक रचनेचे अंतरंग जाणून अनुवाद करणे सोपे नव्हते.' अशी प्रांजळ कबुली धनंजय शहा यांनीच आपली 'भूमिका' मांडत असता दिली आहे, तथापि हे अवघड वाटणारे काम त्यांनी सहज पार पाडले आहे. सहजसोप्या मराठीत भाषांतर केले आहे, जे वाचकाची उत्कंठा कायम ठेवते.

'प. पू. गुरुदेव १०८ समंतभद्र महाराज समग्र : जीवन चरित्र' ही धनंजय शहा यांची २०२२ मध्ये प्रकाशित स्वतंत्र कलाकृती आहे. या काळापूर्वी गुरुदेवांची चरित्रवजा आणि त्यांच्या कार्याचा परिचय देणारी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. तरीही; '... गुरुदेवांचे जीवन हिऱ्यासारखे असून हिऱ्यावर जेवढे जास्त लहानमोठे पैलू पाडावे तसा प्रकाश फाकतो; तसे गुरुदेवांवर अनेक चरित्रे लिहिली गेली तरी त्या जीवनासंबंधी अनेक नवनवीन सुप्तगुणांची प्रचीती येत राहते, म्हणूनच चरित्रे उपलब्ध असली तरी काही अंशाने गुरुदेवांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी कृतज्ञता म्हणून हे गुरुदेवांचे चरित्र प्रकाशित करत आहोत.' असे गुरुकुल स्नातक मंडळाच्या वतीने श्री. बी. ए. शिखरे यांनी 'प्रकाशकीय'मध्ये दिले आहे. या चरित्र ग्रंथाची भाषा सरळ तरीही लालित्यपूर्ण आहे. यामुळे वाचकाला कांटाळवाणे वाटत नाही. हे चरित्र माहितीपूर्ण आणि उद्बोधक आहे. प्रत्येक प्रकरणाचे शीर्षक अतिशय सूचक व अर्थपूर्ण आहे. हिंदी दोहे, मराठी काव्यपंक्ती, इंग्रजी बोधवाक्ये याचा उत्तम वापर करून चरित्र रसाळ बनले आहे... 'इतक्या विस्तृतपणे, माहितीपूर्ण आणि आत्मीयतेने लिहिलेले चरित्र माझ्यातरी पाहण्यात नाही.' असा गौरवपूर्ण अभिप्राय प्रा. श्रीधर हेरवाडे यांनी दिला आहे. वस्तुतः असं वाटतं की, गुरुदेवांचे चरित्र आणि द्विसंधान काव्य अनुवाद या दोन्ही रचना सहृदय आस्वादक, जाणता समीक्षकांच्या प्रतीक्षेत आहेत.

जैन साहित्य परिषदेतर्फे 'जेष्ठ साहित्यिक' म्हणून जो डॉ. ए. एन उपाध्ये पुरस्कार जाहीर झाला, ते ही औचित्यपूर्ण आहे. डॉ. ए. एन उपाध्ये संस्कृत व प्राकृत भाषेचे स्नातकोत्तर पदवीप्राप्त विद्वान होते. १५०पेक्षाही अधिक रिसर्च पेपर्स आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रकाशित झाले. संस्कृत व प्राकृत ग्रथांचे समीक्षणात्मक आणि मूलभूत संशोधनपर प्रस्तावना लिहिल्या आहेत. प्रवचनसार, पंचसूत्र, वरांगचरित, कुवलयमाला, कंसवहो (कंसवध) आदी प्राकृत साहित्य हस्तलिखित प्रतींवरून संशोधित आणि संपादित केले आहेत. जैन प्राकृत साहित्यसंबधी मोलाचे संशोधन, संपादन केले आहे. अशा दिगंत कीर्तिप्राप्त व्यक्तीच्या नावाचा हा पुरस्कार लाभला; जणू श्री. धनंजय शहा याच्या साहित्य कार्याला उचित कोंदण लाभले.

अनेकजण धनंजय शहा यांना प्राध्यापक, उत्तम व्याख्यान देणारा वक्ता, लेखक म्हणून ओळखतात, परंतु या पुरस्कारामागील त्यांच्या साहित्यकार्याची ओळख असेलच असं नाही, त्याची हलकीशी छटा व्यक्त करावी यासाठी हा लेख प्रपंच..



# अशी उभी राहिली बाहुबली विद्यापीठाची अब्दुल लाट शाखा

**श्री. के. बी. गडकरी,**
बाहुबली गुरुकुल स्नातक

आमच्या जन्मगावी हायस्कुलातील गैरसोयीमुळे इ.१०वीत शिक्षण घेणे अशक्यप्रायः झाल्याने काही मित्रांच्या समवेत आम्ही बाहुबली विद्यापीठात प्रवेश घेतला. हे नवीन ठिकाण, अनोळखी अध्यापक यामुळे आपणाला अभ्यासात जम बसेल का म्हणून आम्ही सगळे संचित होतो. अभ्यासात नवीन संकटे निर्माण होणार नाहीत ना? असे पुन्हा पुन्हा वाटत होते.

येथे अनोखी जीवनकला अनुभवायला मिळू लागली. पहाटे पाच वाजता णमोकार महामंत्राचे पठण, अभ्यास देवदर्शन, व्यायाम, नाष्टा, जेवण, शाळा इ. सायंकाळचे लवकर जेवण, मग थोडा वेळ फिरणे, सात वाजता सामायिक, मग वसतिगृहात अभ्यास व रात्री साडे नऊ वाजता निद्राधीन. असा आगळा उपक्रम हळूहळू अंगवळणी पडला.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे प. पू. १०८ समंतभद्र महाराजजींचे दररोजदर्शन घडत होते. उपदेश मिळत असे. तेथे भावी जीवनासाठी शील, ज्ञान, सेवा, प्रेम व व्यवस्था म्हणजे जीवनमूल्ये आहेत हे समजले. त्यांचा स्वीकार करणे का अत्यावश्यक आहे याचे महत्त्वही सांगितले जायचे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांना सुसंस्कृत व सुसंस्कारित करण्यासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या अध्यापकांची कळी प. पू. गुरुदेवांनी तयार केली होती. त्यामध्ये आदरणीय मोहोळकर गुरुजी, करके गुरुजी, मृत्युंजय गुरुजी, शांतिकुमार पाटील गुरुजी, भूपाल दलाल गुरुजी, श्रीधर अण्णा, यशपाल गुरुजी होते. विद्यार्थ्यांसाठी आपले जीवन कसे समर्पित करावे याची मूर्तीमंत उदाहरणे म्हणजे वरील सर्व गुरुवर्य. यांचे आमच्या वरचे संस्कार म्हणजे आम्हाला परिस स्पर्श होता.

दोन वर्षांच्या शिक्षण संस्कारामुळे आणखी शिक्षण घ्यावे अशी ऊर्जा अंतरी निर्माण झाली आणि मग मी बी.एस्सी., बी.एड्.च्या पदव्या प्राप्त केल्या आणि गावच्या शिक्षण संस्थेत सेवानिवृत्तीपर्यंत सेवा केली.

सन २००७ दक्षिण भारत जैन सभेचे ६६वे त्रैवार्षिक अधिवेशन अब्दुल लाट येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी माझी निवड झाली होती. अधिवेशनाचा खर्च वजा जाता रुपये तीन लाख शिल्लक राहिले. त्या रकमेच्या व्याजातून गावातील आपल्या समाजातील गरजू हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यायची असे ठरले त्याची कार्यवाही चालू झाली.

त्या वेळचे दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन मा. डी. ए. पाटील सर लाटेत आलेले असताना त्यांनी विचार मांडला की दिवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे यांचे घराणे लाटेचे पण त्यांचे वास्तव्य कुरुंदवाडला असले तरी त्यांच्या नावाने अधिवेशनाच्या निमित्ताने शिल्लक राहिलेल्या पैशातून दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे इंग्लिश मीडियम स्कूल चालू करावे असा निर्णय झाला आणि ९ जून २००९ पासून कार्यवाही सुरू झाली. जून २००९ ला प्ले ग्रुप, २०१० साली ज्युनिअर केजी ग्रुप व २०११ साली सीनियर केजी वर्ग डॉ. अरिहंत सांगावे यांच्या फार्म हाऊस वर चालू झाले.

सन २०१४ मध्ये आपल्या इंग्लिश मीडियम स्कूलला पहिली ते आठवीपर्यंत म्हणजेच प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेस शासनाकडून मंजुरी

मिळाली. शाळेला सर्व प्रकारची आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याच्या अटीवर मान्यता मिळाली.

बाहुबली आश्रमचे उपाध्यक्ष **मा. श्री. धनराजजी बाकलीवाल यांचे** सुरुवातीपासूनच लाट शाखेच्या शाळेकडे विशेष लक्ष आहे. त्यांनी सुरुवातीसच शाळेच्या बांधकामासाठी **रुपये २५ लाखांची देणगी दिली.** उदगाव निवासी सेवानिवृत्त कस्टम अधिकारी **मा. बी. डी. मादनाईक यांनी रुपये पाच लाखांची** इमारतीसाठी देणगी दिली. बाहेर गावच्या मान्यवर व्यक्तींनीही देणगीसाठी होकार दिल्यावर या शाळेचा मी स्थानिक चेअरमन असल्याने आपणही इमारत देणगी द्यावी म्हणून **माझ्या परिवाराच्या वतीने रुपये पाच लाखांची देणगी** दिली. **मा. धुळाप्पाण्णा बडबडे यांनीही रुपये एक लाखाची देणगी दिली.** रुपये पाच हजारांच्या अनेक देणगीदारांनी देणग्या दिल्या. चार खोल्यांची इमारत उभी राहिली.

**मा. धनराजजी बाकलीवाल यांनी स्वतः, त्यांच्या नातेवाईकांच्याकडून, मित्रमंडळीकडून रुपये ७५ लाखांची देणगी दिलेली आहे.** त्यांचे हे फार मोठे योगदान आहे. शाळेच्या उन्नतीसाठी त्यांचे अंतःकरण पूर्वक हे योगदान आहे. शाळेच्या स्थानिक समितीने निर्णय घेतला की या इंग्लिश मीडियम स्कूलला त्यांच्या मातोश्री **मांगीदेवी प्राथमिक विद्यामंदिर** असे नाव द्यावे. बाहुबली विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांची मंजुरी घेतली. मग त्यांच्या मातोश्रींची नाव शाळेला देण्यात आले.

बालवाडी विभाग **दिवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे बालविकास विद्यामंदिर, अब्दुल लाट** असे कायम स्वरूपात ठेवण्याचे ठरविले आहे.

अनेक पालकांची आग्रही मागणी होऊ लागली की शाळेचे माध्यम इंग्रजी ऐवजी मराठी असावे या गोष्टीचा सारासार विचार करून शाळेचे माध्यम मराठी असावे असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. सोय असावी म्हणून सेमी इंग्रजीचा निर्णय घेतलेला आहे.

मुलांच्यासाठी, मुलींच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधून घेतली आहेत. आज-काल डिजिटल शिक्षणाकडे कल वाढलेला आहे. त्यामुळे आपल्या शाळेतही डिजिटल बोर्ड तयार करून घेतलेले आहेत. बालवाडी विभागास क्रीडोची व्यवस्था केलेली आहे. या गोष्टी विद्यार्थ्यांच्या बरोबर पालकांनाही आवडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्या वाढीवर सुपरिणाम झालेला आहे.

आज शाळेत विद्यार्थ्यांसाठी बारा वर्ग खोले आहेत. सर्व वर्गात विद्यार्थी बसतात. आज शाळेत चारशे विद्यार्थी शिकत आहेत. पुढील वर्षी विद्यार्थी आणखी वाढण्याची शक्यता आहेत. पुढील वर्षी विद्यार्थी आणखी वाढण्याची शक्यता आहे. म्हणून चार खोल्यांचे बांधकाम सुरू आहे. काम प्रगतीपथावर आहे.

आज कॉम्प्युटरचे शिक्षण अत्यावश्यक झाले आहे. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच कॉम्प्युटरचे शिक्षण देण्यासाठी शाळेने रोटरी क्लब इचलकरंजी यांच्याकडून दहा कॉम्प्युटर व प्रिंटर देणगी स्वरूपात मिळविले आहे.

बाहुबली विद्यापीठाचे स्नातक मंडळ नेहमीच विधायक कार्य करीत असते. बाहुबलीची नवीन शाखा लाटेच्या म्हणजे मंडळींनी चालू केल्याचे ऐकून स्नातक मंडक्ळींनी येथे येऊन पाहणी केली. त्यांना हे कार्य भावले.

वैयक्तिकरित्या काही जणांनी या शाखेसाठी देणग्या दिल्या. दोन वर्षांपूर्वी १) प. पू १०८ समंतभद्र महाराज यांचे समग्र चरित्र २) चंदन परिमल ३) गुरुकुल जीवन समर्पित गुरुजन चरित्र ही तीन पुस्तके स्नातक मंडळाने प्रकाशित केली आहेत. या तीनही पुस्तकांच्या प्रत्येकी शंभर प्रति दिल्या आहेत.

अर्थात देणगी स्वरूपात पुस्तकांची विक्री करून आलेले पैसे या शाखेला जमा करणे सांगितले आहे.

गुरुदेवांच्या छत्रछायेत दोन वर्षे वावरण्याचा सुयोग आम्हाला आला. त्यांच्या दर्शनाने, आशीर्वादाने आमचे जीवन उजळून निघाले. ज्यांनी

आपले जीवन दुसऱ्यांसाठी दिले. त्यांच्या प्रेरणेमुळेच बाहुबलीची शाखा अब्दुल लाट येथे स्थापन व्हावी, असा स्फुल्लिंग आम्हा लाटवासी यांच्या मनात फुलला असेल?

इ. १०वीमध्ये आम्हाला आलेल्या संकटामुळे बाहुबलीला शिक्षणासाठी जाणे भाग पडले. आम्हाला तेथे खूप म्हणजे खूपच गोष्टी शिकता आल्या. त्या वेळच्या त्या संकटाकडे पाहिल्यावर आज वाटते त्यावेळी आमच्या मार्गात संकट आले नसते तर नवीन काही शिकता आले नसते. एका सामान्य विद्यार्थ्यासारखे जीवन घडले असते. संकटाने आपली निरनिराळी रूपे आम्हाला त्यावेळी दाखवली. असे आम्हाला आज वाटते. संकट म्हणजे नवे ज्ञान, संकट म्हणजे नवी दृष्टी, संकट म्हणजे परिवर्तन, संकट म्हणजे नवीन मार्गाचा शोध.

या गावातील तरुण, होतकर, सुशिक्षित, कार्य कुशल कार्यकर्त्यांची बाहुबली विद्यापीठाची स्थानिक कार्यकारिणी निवडण्यात आलेली आहे. नवीन संकल्पना घेऊन उत्तम प्रकारे जबाबदारी पार पाडतील अशी खात्री वाटल्याने यांची निवड करणेत आली आहे.

१) श्री. सुभाष चंद्रशेखर अक्कोळे – अध्यक्ष
२) श्री. राहुल रावसाहेब गौराई – उपाध्यक्ष
३) श्री. भरत कल्लाप्पा गडकरी– सेक्रेटरी
४) श्री. भूपाल बंडू गिरमल – कोषाध्यक्ष

आणखीही काही सहयोगी संचालक आहेत.

प. पू. १०८ समंतभद्र महाराजांनी बाहुबलीला सन १९३४ साली ब्रह्मचर्याश्रम व बाहुबली विद्यापीठ स्थापन केल्यावर सन १९३८ साली अब्दुल लाटेला बाहुबली विद्यापीठाची पहिली शाखा स्थापन केली. पण त्यावेळच्या काही अडचणीमुळे दोन–तीन वर्षात ही शाखा बंद पडली. एका धर्मप्रेमी व्यक्तीकडून गावात बाहुबलीची शाखा सुरू झाल्यावर रस्त्यालगत त्याची एक एकर जागा शाखेला दिली. शाखेसाठी इमारत बांधण्याचा संकल्प अपुरा राहिला. प. पू. १०८ गुरुदेवांच्या मनात लाटेला बाहुबलीची शाखा सुरू व्हावी असा स्वर्गातही त्यांचा संकल्प असावा म्हणूनच ७० वर्षानंतर पुन्हा ही शाखा उभी राहिली. याबद्दल लाटेतील धर्म बांधवांना महाराजजी स्वर्गातून आशीर्वाद देत असतील!


## बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांची श्रवणबेळगोळ तीर्थवंदना सानंद संपन्न

आजच्या या AIच्या युगात पाठांतर करण्याची क्षमता सर्वजण विसरूनच गेलेले आहेत. पण बाहुबली गुरुकुल हे मात्र विद्यार्थ्यांना लौकिक शिक्षणासोबतच आध्यात्मिक व नैतिक शिक्षण देण्यामध्ये अग्रेसर आहे. गुरुकुलातील अनेक विद्यार्थ्यांनी धर्मग्रंथ पाठांतर केलेले आहेत. त्यामध्ये द्रव्यसंग्रह, रत्नकरंड श्रावकाचार, छहढाला, इष्टोपदेश, समाधीशतक अशा अनेक प्राकृत व संस्कृत स्तोत्रांचे पाठांतर विद्यार्थ्यांच्या द्वारे केले गेले आहे. अशा विद्यार्थ्यांचे उत्साह, धर्माप्रती असणारी रुची पाहून प्रतिवर्षी संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना तीर्थक्षेत्राचे दर्शन घडवून आणले जाते.

यावर्षी ५ जून ते ११ जून पर्यंत दक्षिण भारत तीर्थयात्रा अर्थात् श्रवणबेळगोळ व अन्य जैन क्षेत्रांच्या दर्शनासाठी विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी अनेक मंदिरांचे दर्शन घेत तेथील भट्टारक स्वामींच्या समोर पाठांतर केलेल्या ग्रंथांचे प्रस्तुतीकरण केले. हुमचा, मूडबिद्री, श्रवणबेळगोळ इत्यादी मठातील भट्टारक स्वामींनी या विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले व भविष्यामध्ये हेच विद्यार्थी जैन परंपरा व संस्कृती जपतील असे उद्‌गार काढत त्यांना आशीर्वाद दिले. विद्यार्थ्यांनी सर्व जैन क्षेत्रावरती सकाळी अभिषेकासोबतच सायंकाळची आरती–भक्ती इ. भावपूर्वक करत आपली ही तीर्थवंदना भक्तिमय वातावरणात सानंद संपन्न केली.

अशा या तीर्थवंदनेसाठी श्री. सुहास शहा, मुंबई यांच्याकडून आर्थिक सहयोग मिळाला व त्यांनी देखील विद्यार्थ्यांच्या समवेत तीर्थयात्रेचा लाभ घेतला. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे श्री. एस. एस. पाटील सर, श्री. शुभम तेरदाळे, श्री. सुयश मगदूम अण्णा हे सुद्धा या तीर्थवंदनेसाठी मुलांच्या समवेत होते.

( छायाचित्रे पृष्ठ क्र. ४३वर)



# भाव सुमनांजली..!!

‘बघेरवालरत्न’ पुरस्काराने सन्मानित नागपूर येथील ख्यातनाम **पंडित श्री. मनोहरजी आग्रेकर** यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी दि. १ जून २०२६ रोजी णमोकार मंत्राच्या गजरात देह परिवर्तन झाले. त्यांचा जन्म २९ मार्च १९३४ रोजी कारंजा येथे झाला. बालपणापासूनच त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता प्रत्ययास येत होती. त्या बुद्धिमत्तेला कोंदण सुद्धा तसेच मिळाले. शिक्षणासाठी ते श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल, कारंजा येथे दाखल झाले. तेथे प. पू. गुरुदेव श्री समंतभद्र महाराज आणि श्रद्धेय तात्याजी (पं. माणिकचंदजी चवरे) या विभूतींच्या सान्निध्याचा परीस स्पर्श त्यांच्या बुद्धिमत्तेला लाभला. नंतर पुढील शिक्षणासाठी ते नागपूरला गेले आणि चिकाटीने B. A., M. A., B.T. (Bachelor of teaching) या पदव्या प्राप्त करीत राजेंद्र विद्यालय, नागपूर येथे अध्यापक म्हणून रुजू झाले. अल्पावधीत ते विद्यार्थीप्रिय शिक्षक बनले आणि आपल्या कार्याचा असा ठसा उमटवला की पुढे जाऊन प्राचार्य पदी त्यांची नियुक्ती झाली.

लौकिक जीवनात यशाच्या पायऱ्या चढत असतानाच जैन तत्त्वज्ञानाच्या प्रांतातही अवगाहन सुरूच होते. धार्मिक संस्कारांचे बाळकडू गुरुकुलात मिळाले होतेच. परिश्रमपूर्वक हा व्यासंग अधिकच गाढा बनत गेला. जोडीला अध्यापनाची मनस्वी आवड. फलस्वरूप शाळेतील व्याप सांभाळतानाच मोठ्या मंदिरातील पाठशाळेत नियमित शिकवणे सुरू केले. तत्त्वार्थसूत्र, द्रव्यसंग्रह, प्रवेशिका, छहढाला, पंच स्तोत्र इत्यादी अनेक ग्रंथांचे अध्यापन करून अनेकांमध्ये धर्म तत्त्वज्ञानरूपी बीजारोपण केले. मराठी, हिंदी, संस्कृत, प्राकृत, इंग्रजी या भाषांवरील प्रभुत्व, संस्कृत मधील अनेक सुभाषिते कंठस्थ, शुद्ध उच्चार आणि जोडीला प्रभावी वक्तृत्व – या सर्वांच्या समुच्चयामुळे श्रोते त्यांचे प्रवचन श्रवण करताना खिळून राहत असत. ‘वाणीभूषण’ उपाधी सर्वार्थाने लागू असणाऱ्या त्यांच्या वक्तृत्वाची ख्याती सर्वदूर पोहचल्याने अनेक गावातून पर्युषण पर्वातील प्रवचनांसाठी, धार्मिक शिबिरातील अध्यापनासाठी त्यांना निमंत्रणे येत असत. अशाच एका पर्युषण पर्वात शिवनी येथील मंदिरात केलेल्या प्रवाही आणि प्रभावी प्रवचनांमुळे तेथील समाज एवढा प्रभावित झाला की, त्यांनी चांदीच्या रथातून पंडितजींची मिरवणूक काढली. विधानाचार्य, प्रतिष्ठाचार्य म्हणून अनेक विधानांसाठी प्रतिष्ठा महोत्सवासाठी त्यांना निमंत्रणे येत असत. अशी कितीतरी विधाने, प्रतिष्ठा महोत्सवे त्यांच्या नेतृत्वात सफलतापूर्वक पूर्णत्वास गेली.

हे सर्व व्याप सांभाळत असतानाच श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन मोठ्या मंदिरचे सचिव पदही त्यांनी कुशलतापूर्वक सांभाळले. बाहेरच्या जगात, राजकारणात घडणाऱ्या घडामोडींबद्दल अपडेट राहत असत. एकीकडे ज्योतिषशास्त्राचा सुद्धा गाढा अभ्यास होता. वयाच्या ९३व्या वर्षी आयुष्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत सक्रिय होते. शेवटच्या दिवशी म्हणजे १ जूनला शहरातील अनेक मंदिरांची वंदना केली. नागपूरला ससंघ विराजमान प. पू. समयसागरजी महाराजांचे दर्शन घेतले. दिनचर्येचा नित्य भाग असणारा स्वाध्याय केला. सायंकाळी आरती केली. तदनंतर शारीरिक अस्वस्थता जाणवून अंतसमय जवळ आला आहे हे लक्षात येताच ‘ओम’चे उच्चारण सुरू केले आणि शांतपणे आकुलतारहित मृत्यू महोत्सव साजरा करून मोक्षमार्गावर अग्रेसर झाले. त्यांच्या जाण्याने समाज एका हितैषीला मुकला आहे. त्यांना लवकरच मोक्षलक्ष्मीची प्राप्ती होवो, या मंगल भावनेसह सन्मति परिवार भावपूर्ण शब्द सुमनांजली अर्पण करीत आहे. ॐ शांति ।

**डॉ. लीना उदय चवरे,** कारंजा लाड

## अतिशय क्षेत्र बाहुबली येथे श्रुतपंचमी पर्व व आचार्य पदारोहण दिन उत्साहात संपन्न

अतिशय क्षेत्र बाहुबली येथे श्रुतपंचमी पर्व तसेच आचार्य पदारोहण दिन अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मंगल प्रसंगी परमपूज्य आचार्य श्री सुयशसागरजी महाराजजी, मुनिश्री सारस्वतसागरजी महाराज, मुनिश्री सिद्धसागरजी महाराज व मुनिश्री जयंतसागरजी महाराज व अनेक महाराजजी व आर्यिका माताजी अशा एकूण १२ त्यागी गणांचे पावन सान्निध्य लाभले.

श्रुतपंचमी पर्वानिमित्त जिनवाणी विराजमानकर्ता पं. श्री. विकासजी छाबडा परिवार यांच्या हस्ते विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिनवाणीची भव्य मिरवणूक हत्तीवरून व पालखीतून काढण्यात आली. मिरवणुकीत विद्यार्थ्यांच्या झांज पथकाने आकर्षक सादरीकरण करून वातावरण भक्तिमय केले.

कार्यक्रमात आचार्य श्री सुयशसागरजी महाराज, मुनिश्री सारस्वतसागरजी महाराज तसेच आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी यांचे मंगल आशीर्वाद लाभले. यावेळी श्रुतपंचमी पर्वाचे महत्त्व विशद करण्यात आले. जैन आगम साहित्याची निर्मिती, आचार्य धरसेन, आचार्य पुष्पदंत आणि आचार्य भूतबली यांनी लिपिबद्ध केलेल्या षट्खंडागम या महान ग्रंथाची माहिती उपस्थितांना देण्यात आली. तसेच धवला, जयधवला आणि महाधवला या ग्रंथांचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वही स्पष्ट करण्यात आले.

यानंतर आचार्यश्रींची पादपूजा व जिनवाणी अर्पण हा कार्यक्रम संस्थेचे संचालक व ट्रस्टी यांच्या हस्ते संपन्न झाला. आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी यांनी आचार्य पद किती महत्त्वाचे असते याविषयी बोलताना त्या म्हणाल्या, आपल्या आत्म्याची अनुभूती करत आपल्या संपूर्ण संघाचे प्रतिनिधित्व करत असताना खूप संयम व साम्यभाव ठेवावा लागतो. आचार्य पद खूपच कठीण असून त्याचे महत्त्व कितीही गायले तरी कमीच आहे.

या प्रसंगी बाहुबली संस्थेचे संचालक श्री. गोमटेश बेडगे, श्री. तात्यासाहेब अथणे, श्री. अनिल हिंगलजे, डॉ. नेमिनाथ शास्त्री, श्री. रवींद्र देसाई गुरुकुलचे सर्व विद्यार्थी व अनेक श्रावक-श्राविका व साधर्मी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रुतपंचमी पर्व आणि आचार्य पदारोहण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाने धर्म, ज्ञान आणि जिनवाणीप्रती श्रद्धा वृद्धिंगत करण्यास मोठी प्रेरणा मिळाली.

## सम्यक् शांती-विद्या ज्ञानसंस्कार शिबिर संपन्न

आजच्या या काळात संस्काराच्या अभावामुळे धर्ममार्गातून, धर्म कुळातून पलायनाची वृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या कुआचरणावरती आळा घालण्यासाठी, परिवर्तनाचा मार्ग अवलंबण्यासाठी आध्यात्मिक, नैतिक व संस्काराची जोड दिल्याने समाजामध्ये ज्ञान प्राप्ती होऊन संस्काराची अभिवृद्धी व्हावी तसेच समाजातील युवक-युवती व्यसनमुक्त व्हावे व धर्म मार्गामध्ये आरुढ होऊन धर्मध्वजा आपल्या आचरणाने व विचाराने फडकवावेत, याच हेतूने संत शिरोमणी आचार्यश्री विद्यासागरजी महामुनिराज व परमपूज्य अध्यात्मविद्या शिरोमणी आचार्य श्री समयसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने, तसेच परमपूज्य निर्यापक नियमसागरजी व मुनिश्री अक्षयसागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने परमपूज्य मुनिश्री उत्कृष्टसागरजी महाराज व आर्यिका निष्काममती माताजी, आर्यिका विरतमती माताजी, आर्यिका ध्रुवमति माताजी, तसेच अध्यापनासाठी २५हून अधिक ब्रह्मचारी भैय्याजी व दीदीजी यांच्या समवेत १४ ते २४ मे २०२६ या कालावधीत सम्यक् विद्या ज्ञान संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर शांती-विद्या ज्ञानसंवर्धन संस्था, जयसिंगपूर यांच्यावतीने व श्री बाहुबली संस्थेच्या सहयोगाने बाहुबली येथे संपन्न झाले. सुमारे एक हजारहून अधिक लोकांनी याचा लाभ घेतला. चांगली धर्म प्रभावना झाली.

## गुरुदेवश्री समंतभद्र महाराजद्वारा संस्थापित बाहुबलीच्या सर्व शाखाअंतर्गत अध्यापकांच्या कार्यशाळेची क्षणचित्रे...



सौ. उत्कर्षा मोटे, सांगली



श्री. अविनाश कुलकर्णी पुणे



डॉ. राजेश बनकर आहिल्यानगर



श्री. संदीप वाकचौरे संगमनेर



श्री. युवराज पाटील गारगोटी



कार्यशाळेच्या प्रसंगी मान्यवर अतिथींचा सन्मान करताना संस्थेचे पदाधिकारी श्री. डी. सी. पाटील. श्री. बाबासाहेब पाटील, श्री. गोमटेश बेडगे, श्री. वृषभनाथ मलिकवाडे, श्री. सुरेश चौगुले

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ३१वर)

## बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांची श्रवणबेळगोळची तीर्थवंदना



मूडबीद्रीचे भट्टारक श्री चारूकीर्ती महास्वामीजी यांच्यासोबत..

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४०वर)

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 30-06-2026

# बाहुबली येथे करणानुयोग शिबिर संपन्न



श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे दिनांक १० जून २०२६ ते २६ जून २०२६ अखेर कषायपाहुड पुस्तक १० व ११ या महासिद्धांत ग्रंथांची वाचना पूर्ण झाली. यासाठी प. पू. आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, प. पू. मुनिश्री १०८ श्री सुयोगसागरजी महाराज, प. पू. मुनिश्री १०८ श्री सहिष्णुसागरजी महाराज, प. पू. आर्यिका १०५ श्री अनुश्रुतमति माताजी, प. पू. आर्यिका १०५श्री शुध्दोऽहंश्री माताजी, प.पू. आर्यिका १०५ श्री संवित्तिश्री माताजी, प.पू. आर्यिका १०५ श्री सुदृष्टिश्री माताजी, प. पू. क्षुल्लक १०५ श्रीसुभद्रसागरजी महाराज, प. पू. क्षुल्लिका १०५ श्री सुधृतिश्री माताजी या त्यागीगणांचे मंगल सान्निध्य लाभले. तसेच श्रमणाचार्य १०८ श्री विशुद्धसागरजी महाराज यांचे शिष्य मुनी १०८ श्री सारस्वतसागरजी महाराज, मुनी १०८ श्री जयंतसागरजी महाराज, मुनी १०८ श्री सिद्धसागरजी महाराज यांनीही या सिद्धांत ग्रंथांचे रसपान केले. या शिबिराकरिता आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी व पं. श्री. विकासजी छाबडा इंदोर यांचे विशेष मार्गदर्शन व अध्यापन लाभले. या सिद्धांत ग्रंथांच्या स्वाध्यायासाठी ब्र. रेवतीताई दोशी अकलूज, ब्र. आभा दीदी दिल्ली, पं. श्री. संयम शास्त्री नागपूर, पं. श्री. सम्मेद गांधी कोटा, ब्र. श्री सुनील भैया जबलपूर याशिवाय दिल्ली, बिना, इंदोर, सोलापूर, पुणे अशाप्रकारे महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान या प्रांतातील विशेष जाणकार लोक उपस्थित होते. आज अशाप्रकारच्या सिद्धांत ग्रंथांची वाचना व त्याचे मर्म सांगणारे लोक अत्यंत तुरळकच आहेत. पण श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे हा करणानुयोगाचा महान ज्ञानयज्ञ अतिशय आनंदाने संपन्न झाला. सुमारे ४०हून अधिक विद्वानांनी लाभ घेतला. या सर्वांच्यासाठी डॉ. शीतल शहा पंढरपूर यांच्यातर्फे शुद्ध भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. बाहुबली संस्थेने अशाप्रकारचे शिबिर आयोजित केल्याने त्याची एक आगळीवेगळी प्रतिमा तयार झाली आहे. गेल्या पंधरा वर्षात गोमटसार जीवकांड, कर्मकांड, लब्धिसार, क्षपणासार, धवला या ग्रंथांची सखोल तत्त्वचर्चा शिबिराच्या माध्यमातून येथे घडली आहे. अशा प्रकारची चाळीसहून अधिक शिबिरे संपन्न झाली आहेत.

**विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्‌भावना...!!**

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi
BHIM UPI

प्रेषक,
www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर–४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 30-06-2026

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली